POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०४ ● मुंबई, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## XII नावाचा व्हॉट्सअप ग्रुपवर फुटला बारावीचा पेपर

## कनेक्शन गेलं क्लासेस संचालकापर्यंत... पोलिसांकडून मोठी कारवाई!

**काय घडलं नेमकं?**
नागपुरात बारावीचे २ पेपर फुटल्याच्या घटनेनंतर फक्त नागपुरातच नाही तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. बारावीचे फिजिक्स आणि केमिस्ट्री च्या प्रश्नपत्रिका पेपर सुरू होण्याआधीच अधार्तास एका व्हाट्सअप ग्रुपवर आढळून आल्या होत्या.. दरम्यान या पेपरफुटीप्रकरणी आता नागपूर पोलिसांनी मोठा कारवाई करत चौघांना बेड्या ठोकलेत. या चौघांमध्ये एका खासगी क्लास संचालकाचाही समावेश आहे.




■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

नागपूरमधील पेपर फुटीसंदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. बारावी पेपर फूटल्याप्रकरणी शिकवणी वर्गाच्या संचालकासह चौघांना पोलिसांनी बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या पेपरफुटी प्रकरणी पोलीसांना अजून काही धागेदोरे मिळालेत. त्याअनुशंगाने पोलिसांना तयासही सुरू आहे. आता एसआयटीमार्फत या पेपरफुटीची चौकशी होणाराय. नागपूर पेपटफुटी प्रकरणी चौघांना बेड्या ठोकण्यात आल्या. आरोपींमध्ये खासगी क्लास संचालकाचाही समावेश असून मोठं रॅकेट उघड होण्याचा पोलिसांना संशय आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

**मुळाशी जाऊन दोषींवर कारवाई**

पेपरफुटी प्रकरणी निशिकांत मून या ट्र्युशन क्लासेस संचालकसह अजून काही क्लासेसच्या संचालकांचा समावेश आहे का? याचा तपास आता पोलिसांनी सुरू केलाय.हे रॅकेट बरेच मोठे असल्याचा संशय ही पोलिसांना आहे. आता राज्यमंत्र्यांनी एसआयटी घोषणा केल्यामुळे या प्रकरणाची तपासाची व्याप्ती ही वाढणार आहे.त्यामुळे आता या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन दोषींवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

**एसआयटी स्थापन करणार**
नागपूर पेपरफुटी प्रकरणी चौघांना अटक करण्यात आलीय. खासगी क्लासेस संचालक निशिकांत मून आणि फरहान तसेच जुनेद आणि मुस्तफा हे पोलिसांच्या तावडीत सापडलेयत. नागपूर पेपरफुटी प्रकरणी मोठं रॅकेट सक्रीय असण्याची शक्यता वर्तवली जातेय. दरम्यान या पेपर फुटी प्रकरणाचा एसआयटी मार्फत तपास केला जाणार आहे. या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात आल्याची माहिती शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिलीय.

**झडतीत सापडला मोबाईल**
नागपूरच्या सदर परिसरातील सेंट उसुर्ला परीक्षा केंद्रावर गुरुवारी बारावीच्या केमिस्ट्रीच्या पेपर दरम्यान हे पेपर फुटीचं प्रकरण पर्यवेक्षकाच्या सतर्कतेमुळे उघडकीला आलं.सेंट उसुर्ला परीक्षा केंद्रावर एक विद्यार्थिनी वारंवार प्रसाधनगृहात जात होती. त्यामुळे केंद्रावरील पर्यवेक्षकाना संशय आला. तिची शिक्षकेच्या माध्यमातून झडती घेण्यात आल्यावर एक स्मार्टफोन जप्त करण्यात आला.तो मोबाईल तपासला असता हा पेपरफुटीचा प्रका उघडकीला आलाय.

**व्हॉट्सअप ग्रुप सदस्यांवर कारवाई**
क्कनावाचा व्हॉट्सअप ग्रुप तयार करण्यात आला होता. पेपरच्या आधी अर्धा तास संबंधीत व्हॉट्सअप ग्रुपवर पेपर आले होते. बारावीचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचे पेपर व्हॉट्सअप ग्रुप लिक झाले. या व्हॉट्सअप ग्रुपचे एकूण २१ सदस्य आहेत. त्यामुळे या व्हॉट्सअप ग्रुप असणाऱ्या सर्व सदस्यांची चौकशी होण्याची शक्यता आहे.

## राज्यात वर्षभरात दीड हजार ड्रग्ज तस्करांना बेड्या

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात अमली पदार्थांच्या तस्करीचे जाळे दिवसेंदिवस अधिक विस्तारत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गेल्या वर्षभरात (२०२५) राज्यात अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या १ हजार ४५४ जणांना अटक करण्यात आली असून, एकूण १५ हजार ४०८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राज्याच्या गृहविभागाने मंगळवारी विधानसभेत एका तारांकित प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरातून ही आकडेवारी समोर आली आहे.

राज्यात अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण चिंताजनक असून, २०२५ मध्ये अशा १३ हजार ९५४ व्यक्तींवर गुन्हे नोंदवण्यात आले. याची सरासरी पाहिल्यास राज्यात दर महिन्याला अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या १ हजार १६२ जणांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अमली पदार्थांच्या सेवनाप्रकरणी गुन्हे दाखल झालेल्या १३ हजार ९५४ व्यक्तींपैकी ३ हजार २६८ जण अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत.

वर्षभरात अमली पदार्थांच्या वाहतुकीवरही मोठी कारवाई करण्यात आली आहे. तस्करी आणि वाहतूक केल्याप्रकरणी ३ हजार ६५९ गुन्हे दाखल झाले असून, त्यात ५ हजार ३०७ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या संपूर्ण कारवायांमध्ये राज्यात तब्बल १ हजार ३४० कोटी ४१ लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

**मुंबई 'ड्रग हब' होण्याच्या मार्गावर?**
राज्याची राजधानी मुंबई अमली पदार्थांचे केंद्र (हब) बनत असल्याचे चित्र या आकडेवारीवरून दिसत आहे. १ जानेवारी ते ११ फेब्रुवारी २०२६ या अवघ्या ४२ दिवसांच्या कालावधीत मुंबईत तस्करीचे ९३ गुन्हे दाखल झाले आहेत. याप्रकरणी ११२ जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ७ कोटी ९३ लाख रुपयांचे अमली पदार्थ हस्तगत करण्यात आले आहेत.




## परभणीत शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन, महिला बेशुद्ध

■**परभणी। प्रतिनिधी,**

परभणी गंगाखेड महामार्गावरील शिंगणापूर पाटीवर शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी दोन तासांपासून शेतकऱ्यांचे रास्ता रोको सुरू आहे. शेतकरी आणि पोलिसांमध्ये जमीन मोजणीवेळी मोठी झटापट देखील झाली. यानंतर ग्रामस्थ या शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात आंदोलनाला बसले. यावेळी परभणी जिल्हातील अनेक मोठे नेतेही पोहोचले. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी परभणीच्या शिंगणापूर पाटीवर सलग ३ तास शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. या रास्तारोकोमध्ये खासदार संजय जाधव यांच्यासह सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. या आंदोलनात सहभागी झालेल्या सहजपूर जवळा येथील सीमा बागल नावाच्या शेतकरी महिलेला वाढत्या तापमानामुळे भोवळ आली. यावेळी त्यांची दातखिळ ही बसल्याचं बघायला मिळालं.

सीमा बागल यांच्यावर उपचार करण्यासाठी त्यांना परभणीच्या रुग्णालयात हलविण्यात आल आहे. ४ मार्च



रोजी शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी महामोर्चाचे आयोजन करण्यात आलं आहे. या आंदोलनाबद्दल बोलताना खासदार संजय जाधव यांनी म्हटले की, शेतकरी वडीलोपार्जित जमीन शक्तीपीठ महामार्गाला द्यायला तयार नाहीयेत.

शेतीवर शेतकऱ्यांची उपजीविका आहे, पैसे काय शेतकरी खाणार आहेत का? शेतकऱ्यांना आपल्या जमिनी विकायच्या नाहीत. सहजपूर जवळा येथे जमीन मोजणीवेळी शेतकऱ्यांवर अमानुष अत्याचार करण्यात आले. महसूल आणि पोलीस प्रशासनाने सहजपूर जवळ शेतकऱ्यांवर अत्याचार केले. भाजपला काही घेणं नाही देणं नाही, यांना केवळ यांचा हेतू साध्य करायचाय, अडाणी, अंबानी यांच्यासारख्या लोकांच्या मदतीने निवडणुका जिंकत आहेत.

पैश्यातून सत्ता आणि सत्तेतून पैसा ही एकमेक भूमिका भाजपची देशात सुरू आहे. माझं शेतकऱ्यांना आव्हान आहे यांना वेळच्यावेळी धडा शिकवा. ही संधीसाधू लोक आहेत, यांची वेळ आली की हे पायापाशी बसणार. काम संपलं की डोक्यावरून लघुशंका केल्याशिवाय राहणार नाहीत. अश्या हरामखोर लोकांना वेळीच रोखण्याची गरज निर्माण झालीय, महाराष्ट्र भरातल्या शेतकऱ्यांचा शक्तीपीठ महामार्गाला विरोध आहे.

मला असे वाटते ज्या अमानुष पद्धतीने तुम्ही वागायला लागलात त्यावरून तुम्ही जनतेच्या मतावर नाहीत तर ईव्हीएम वरूनच निवडून आलात. जनतेच्या मतावर निवडून आले असता तर तुम्ही जनतेचा मताचा आदर केला असता आणि शक्तीपीठ महामार्ग रद्द केला असता असेही संजय जाधव यांनी म्हटले.

## सोलापुरात मराठा क्रांती मोर्चाचं भाजप विरोधात मुंडन आंदोलन

### महापौर पदावरुन नाराजी

■**सोलापूर। प्रतिनिधी,**

"सोलापुरात मराठा समाजावर वारंवर राजकीय अन्याय होत आला आहे. १९९३ साली मराठा समाजाचा महापौर झाला होता. यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपला घवघवीत यश आले आहे.

१०२ पैकी ८७ नगरसेवक भाजपचे निवडून आले आहेत. सोलापुरात मराठा समाजाची मतदारसंख्या आणि लोकसंख्या ही निर्णयाक भूमिका घेण्यासारखी आहे. सोलापूरच्या महापौर निवड करताना मराठा समाजाला प्राधान्य देणे गरजेचे होते. विनायक कोंड्याल यांना महापौर केले. त्यामुळे सोलापूर मधील मराठा समाज भाजपवर नाराज आहे", अशी भूमिका मराठा क्रांती मोचार्ची



आहे. मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक राम जाधव यांनी मंगळवारी दुपारी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर स्वतःचे मुंडन करून भाजपचा निषेध केला आणि पालकमंत्री जयकुमार गोरेंवर रोष व्यक्त केला.

**विद्यमान महापौरांनी राजीनामा देण्याची आंदोलकांची मागणी**

सोलापुरात भाजपच्या स्थानिक काही प्रमुख राजकीय व्यक्तींनी मराठा समाजावर राजकीय अन्याय केल्याचा आरोप करत राम जाधव यांनी रक्ताने पत्र लिहिलं. तसेच आज मंगळवारी दुपारी मराठा समाजाचा महापौर का केला नाही? असा सवाल करत मुंडण आंदोलन करण्यात आले. ही वेळ या राजकीय लोकांनी मराठा समाजावर का आणली? मराठा समाजावर झालेल्या राजकीय अन्याय विरोधात मराठा आंदोलक तथा मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक राम जाधव यांनी स्वतःच मुंडन केले. सोलापूरच्या विद्यमान महापौरांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही राम जाधव यांनी केली आहे.

जोपर्यंत मराठा समाजाचा महापौर होत नाही तेव्हा पर्यंत हा लढा चालू राहील, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**'१९९३ नंतर मराठा समाजाचा महापौर झालाच नाही', आंदोलकांची भूमिका**
"१९९३ नंतर ३२ वषार्पासून मराठा समाजाला महापौर पदापासून वंचित ठेवले होते. यंदा ३ दशकानंतर मराठा समाजाचा महापौर करण्याची भाजपला संधी असताना भाजपच्या शहरातील काही प्रमुख लोकांनी मराठा समाजाचा महापौर होऊन दिला नाही. १९९३ नंतर ३ वेळा-पद्मसाली समाजाला, २ वेळा- मुस्लिम समाजाला, २ वेळा-लिंगायत समाजाला, २ वेळा- बंजारा समाजाला, तर एकदा ब्राह्मण, कैकाडी, धनगर समाजाला विविध पक्षांतून न्याय देण्यात आला आहे", मराठा क्रांती मोचार्चे समन्वयक राम जाधव म्हणाले.

## मारकुट्या शिक्षकाकडून २५ विद्यार्थ्यांना वेळूच्या काठीनं बेदम मारहाण

■**लातूर। प्रतिनिधी,**

अहमदपूरमध्ये शिक्षकानं २५ विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केलीय. गाडीची नंबर प्लेट वाकडी केल्याच्या कारणावरून शिक्षकानं विद्यार्थ्यांना वेळूच्या काठीनं मारहाण केलीय.विद्यार्थ्यांच्या अंगावर मारहाणीचे वळ दिसताहेत या कृत्यामुळे पालकांनी तीव्र संताप व्यक्त केलाय. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

शिक्षणाची पंढरी असलेल्या लातूर जिल्ह्यात राज्यभरातून शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी येतात. पालक वसतीगृहात त्यांची सोय करतात. मात्र आता विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालाय. कारण अहमदपूर शहरातल्या क्रिस्ट इंटरनेशनल स्कूलमध्ये एका शिक्षकानं २५-३० विद्यार्थ्यांना बेदम चोपलंय.



बरं रागाचं कारण तरी काय? तर विद्यार्थ्यांनी गाडीची नंबर प्लेट वाकडी केली. या रागातून त्या मारकुट्या शिक्षकानं पाचवी सहावीच्या २५-३० विद्यार्थ्यांना वेळूच्या काठीनं वळ उठेस्तोर मारलंय. खरं तर विद्यार्थ्यांना मारू नये, असा कायदा असतानाही इतकं मारलं जात असेल, तर शाळा व्यवस्थापन काय करतंय.. असा प्रश्न पालक विचारत आहेत.. पालकांना शाळेनं याबाबत माहिती दिली नाही, म्हणून त्यांनी संतापही व्यक्त केलाय.

याबाबत स्वतः शाळेच्या व्यवस्थापकानं त्या मारकुट्या शिक्षक उज्वल सोनी विरोधात गुन्हा दाखल केलाय आणि त्या शिक्षकाला पोलिसांच्या ताब्यात दिलं. तसंच त्याला शाळेतून काढून टाकलंय, असं शाळेच्या प्राचार्यांनी सांगितलं. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिलीय. नंबर प्लेट त्या विद्यार्थ्यांनीच वाकडी केली का? याबाबत माहिती नाही पण अशी अमानुष मारहाण करणं, अत्यंत चुकीचं.इतर शिक्षाही त्या मारकुट्या शिक्षकानं दिली असती तरी चाललं असतं. पण रागाच्या भरात माणूस काहीही करतो.. मग पश्चातापाची वेळ येते.शिक्षणाच्या मंदिरातच जर विद्यार्थ्यांवर अन्याय होत असेल तर पालकांनी विश्वास ठेवायचा तरी कुणावर? हा प्रश्न समस्त पालकांना पडलाय.

## पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई... तस्करांच्या मुसक्या आवळल्या, नागपुरात ५०५ किलोंचा गांजा जप्त

■**नागपूर।प्रतिनिधी,**

शहरात अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत नागपूर पोलीस अंतर्गत कार्यरत अँटी नारकोटिक्स टास्क फोर्सने तब्बल ५०५ किलो गांजा जप्त केला आहे. मौदा तालुक्यातील माथनी टोल प्लाझाजवळ सापळा रचून एका ट्रकमधून ही मोठी खेप पकडण्यात आली. या प्रकरणी ट्रक चालकाला अटक करण्यात आली असून, ओडिशाहून नागपूरमध्ये चोरट्या मार्गाने गांजा आणला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अँटी नारकोटिक्स टास्क फोर्सच्या विशेष पथकाने मौदा येथील माथनी टोल नाक्यावर कारवाईची तयारी केली. मोबाईल लोकेशन ट्रॅकिंगच्या सहाय्याने संशयित ट्रकची हालचाल लक्षात घेण्यात आली होती. संबंधित ट्रक ओडिशामधून नागपूरच्या दिशेने येत असल्याची खात्री पटताच पोलिसांनी टोल प्लाझाजवळ सापळा रचला आणि ट्रक अडवला.

ट्रकची कसून झडती घेतली असता त्यामध्ये मालवाहतुकीच्या आड



लपवून ठेवलेले सुमारे ५०५ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी त्वरित संपूर्ण माल जप्त करून ट्रक चालकाला ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या गांजाची बाजारातील किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या कारवाईपूर्वी पोलिसांनी झिंगाबाई टाकळी परिसरात छापा टाकून अब्दुल वहीद उर्फ 'खोका' या कुख्यात ड्रग्ज तस्कराला अटक केली होती. आरोपी आपल्या सासरच्या घरातून गांजा तस्करीचे जाळे चालवत असल्याचे उघड झाले. त्याच्या घरातून सुमारे ७५ किलो गांजा हस्तगत करण्यात आला होता. या दोन्ही कारवायांमुळे नागपूरमध्ये सक्रिय असलेल्या मोठ्या अंमली पदार्थ रॅकेटचा पदार्फाश झाला आहे.

चौकशीदरम्यान अब्दुल वहीदच्या मोबाईलमधील एका संशयास्पद क्रमांकाचे लोकेशन ओडिशामध्ये असल्याचे आढळले. तो क्रमांक नागपूरकडे येत असल्याची माहिती तांत्रिक विश्लेषणातून मिळाली. त्याच आधारे पोलिसांनी मौदा टोल नाक्यावर ट्रक पकडण्याची योजना आखली आणि ही मोठी खेप जप्त करण्यात यश मिळवले. सध्या अटक करण्यात आलेल्या ट्रक चालकाची कसून चौकशी सुरू असून, या आंतरराज्य गांजा तस्करी टोळीमध्ये आणखी कोणकोण सहभागी आहेत? याचा शोध घेतला जात आहे. ओडिशा आणि महाराष्ट्रातील संबंधित संपर्कांची माहिती गोळा केली जात आहे. या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. नागपूरमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## लंडन ते हैद्राबाद विमानात तांत्रिक बिघाड

## १६९ प्रवाशांचा जीव टांगणीला



GPS बिघाड; 169 प्रवासी सुरक्षित

■**नागपूर। प्रतिनिधी,**

ब्रिटिश एअरवेज बोईंग ७८७ हा विमान लंडनहुन हैद्राबादला येत होते. या विमानाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहाटे आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. त्यात १६९ प्रवासी प्रवास करत होते. विमानात तांत्रिक विघड झाल्याने ब्रिटिश एअरवेज कंपनीचे विमानाची आपत्कालीन लँडिंग नागपूर मध्ये करण्यात आलं, यामुळे १६९ प्रवाशांचे जीव भांड्यात पडला. आपत्कालीन परिस्थितीत वैमानिकाने घेतलेल्या या निर्णयामुळेच १६९ प्रवाशांचे प्राण हे वाचू शकले आहेत. सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

विमानात तांत्रिक बिघाडही होता शिवाय दरम्यान हैद्राबाद यामध्ये खराब हवामानामुळे विमानाला लँडिंगची परवानगी नाकारण्यात आली त्यामुळे पयार्यी व्यवस्था म्हणून नागपूर विमानतळावर विमान उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला . पहाटे साडे पाचच्या सुमारास विमान नागपूर विमानतळावर सुरक्षितपणे उतरले आपत्कालीन लँडिंगनंतर विमानाची तपासणी करण्यात आली असून प्रवाशांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या आधी काल रात्री रांची मध्ये नुकताच एअर ॲम्ब्युलन्सचा अपघात झाला. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री यांचे निधन झाले, विमानांच्या वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे विमान प्रवासाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

मुंबईत देखील एका हेलीकॉप्टरचा अपघात झाला आहे. वैमानिकाने तत्परता दाखवून समुद्रात सुरक्षित लँडिंग केल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

## ठाण्यात हाय-प्रोफाइल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश... अभिनेत्रीला अटक, एजंट म्हणून करत होती काम




■**नागपूर।प्रतिनिधी,**

ठाणे शहरात मानवी तस्करीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. ठाणे अँटी-ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटने वागळे इस्टेट परिसरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेला कथित देहविक्री रॅकेट उद्धवस्त केल्याचा दावा केला आहे. या कारवाईत बिहारमधील मूळ रहिवासी असलेल्या एका अभिनेत्रीला अटक करण्यात आली.

**कायदेशीर कारवाई**
या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. "पीडितांची सुटका हा आमचा प्राधान्यक्रम आहे. या रॅकेटशी संबंधित इतर साथीदार आणि संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात आहे," अशी माहिती ठाणे अल्ळवच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. सुटका करण्यात आलेल्या महिलांना पुनर्वसन केंद्रात पाठवण्यात आले असून, या रॅकेटच्या आर्थिक आणि लॉजिस्टिक नेटवर्कचा सखोल तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**सापळा रचून छापा**

स्थानिक हॉटेलमध्ये बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अल्ळव पथकाने नियोजनबद्ध सापळा रचला. छाप्यात दोन महिलांची सुटका करण्यात आली. त्यांना देहविक्रीसाठी शहरात आणल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मुख्य आरोपी असलेल्या अभिनेत्रीची ओळख तपासाच्या दृष्टीने अजून जाहीर करण्यात आली नाही.

**आर्थिक व्यवहाराचा तपास**

प्राथमिक चौकशीत मनोरंजन क्षेत्रात अनिश्चितता आणि नियमित कामाचा अभाव यामुळे संबंधित अभिनेत्री या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करत असल्याचे समोर आले आहे.

प्रत्येक व्यवहारामागे ती सुमारे १५,००० रुपयांचे कमिशन घेत असल्याचा आरोप आहे. उद्योगातील ओळखींचा वापर करून आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना आमिष दाखवल्याची माहिती तपासात उघड झाली आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ग्रेट निकोबार प्रोजेक्ट



ग्रेटर निकोबार बेटावर उभारण्यात येणाऱ्या पायाभूत प्रकल्पाला हरित लवादाने हिरवा कंदील दाखवला आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत 'आंतरराष्ट्रीय विमानतळ', 'सौरऊर्जा प्रकल्प', तसेच 'ट्रान्सशिपमेंट' बंदर, म्हणजेच एका नौकेवरून दुसऱ्या नौकेवर माल चढवण्यासाठी उपयोगी ठरणारे बंदर उभारण्यात येणार आहे. चीनच्या दृष्टीने हाँगकाँग बेटाला सामरिक आणि आर्थिक दृष्ट्या पुष्कळ महत्त्व आहे. जसे चीनसाठी हाँगकाँग, त्याच धर्तीवर भारताला 'ग्रेटर निकोबार' बेट विकसित करायचे आहे. त्यामुळे 'ग्रेटर निकोबार'ला 'भारताचे हाँगकाँग' म्हणूनही संबोधले जात आहे. हा प्रकल्प हाती घेतल्यापासून चीनला ठसका लागला आहे. कारणही तसेच आहे. चिनी नौदलाला हिंद महासागर आणि बंगालचा उपसागर येथे मुक्त संचार करायचा आहे. ग्रेटर निकोबार येथील प्रकल्पामुळे त्याच्या हालचालींवर मयार्दा येणार आहेत. मागील काही वर्षे अमेरिकी नौदलाला मागे टाकून चीन जगातील प्रथम क्रमांकाचे नौदल बनले आहे. त्याच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्याला वेसण घालण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचे कार्य करू शकतो. चीनची व्यापारी सागरी वाहतूक ही मलाक्का सामुद्रधुनीतून होत असते. पुढे मागे युद्ध झाल्यास त्याची आर्थिक कोंडी करायची असल्यास मलाक्का सामुद्रधुनीवर सैन्य कारवाई करण्यास 'ग्रेटर निकोबार'मधील भारताचे सैन्य तळ महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. अंदमानच्या पूर्वेला कोको बेट आहे. वास्तविक हे भारताचे बेट! 'नेहरूंनी ते म्यानमारला आंदण दिले', असा भाजपवाले आरोप करत आहेत. तो एक वेगळा विषय आहे. असो. म्यानमारने चीनसमोर शरणागती पत्करून हे बेट त्याला दिले. चीनने त्याचा कायापालट करून तेथे सैन्य तळ उभारले आहे. हा तळ ग्रेटर निकोबारच्या वरच्या भागात आहे. त्यामुळे त्याला शह देण्यासाठी ग्रेटर निकोबारमध्ये सैन्य तळ उभारणे भारतासाठी आवश्यक नाही, तर अपरिहार्य बनले आहे. बांगलादेशाच्या चितगाव बंदरासह म्यानमारचे सीतवे बंदर येथे चिनी सैन्याची उपस्थिती आहे. श्रीलंकेच्या हंबनटोटा बंदरातही चिनी सैन्याचे तळ आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण वगैरे सर्व ठीक आहे. त्याचे रक्षण करण्यासाठी आधी अस्तित्व टिकणे आवश्यक आहे आणि त्यासाठीच ग्रेटर निकोबारचे स्वरूप पालटणे भारतासाठी आवश्यक बनले आहे. हा प्रकल्प पूर्ण व्हायला ३० वर्षे लागतील, तर त्याचा एक टप्पा वर्ष २०२८ मध्ये पूर्ण होईल. चीनने या प्रकल्पाला विरोध करणे स्वाभाविक आहे; मात्र या प्रकल्पामुळे भारतातील कथित पर्यावरणवाद्यांना पोटशूळ उठला आहे. त्याला 'खो' घालण्यासाठी अनेकांनी हरित लवादाचे दार ठोठावले. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची होणारी हानी, तेथील जमातींचे होणारे विस्थापन आदी सूत्रे अधोरेखित केली होती. 'हरित लवाद आमचे म्हणणे ग्राह्य धरून या प्रकल्पाला स्थगिती देईल', असे या लोकांना वाटले होते; मात्र झाले उलटेच! 'हा प्रकल्प राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्यामुळे त्याला स्थगिती देऊ शकत नाही', असे हरित लवादाने म्हटले. 'हा प्रकल्प उभारतांना काय दक्षता घ्यायला हवी', याचे काही निकष लवादाने घालून दिले आहेत. या प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांमध्ये सोनिया गांधीही आघाडीवर होत्या. त्यांच्या मते हा अमानवी प्रकल्प आहे. त्याच्या विरोधात त्यांनी 'द हिंदू'मध्ये भलामोठा लेख लिहिला आहे. प्रकल्पाला विरोध करणारे गांधी आणि त्यांचे विचार प्रसारित करणारे 'द हिंदू' यातच सर्वकाही आले. पर्यावरणवाद्यांनी आता हरित लवादाने ज्या प्रकरणात निर्णय दिले, ती उकरून काढत 'लवाद कशी दुटप्पी भूमिका घेत आहे?', हे सांगण्याचा उद्योग चालवला आहे. अलीकडेच म्हणजे १२ फेब्रुवारी या दिवशी एका प्रकरणात निर्णय देतांना हरित लवादाचे न्यायमूर्ती शेव कुमार सिंह आणि तज्ञ सदस्य सुधीर कुमार चतुवेर्दी यांच्या खंडपिठाने 'पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करणे, हे मानवी जीवनाच्या विरोधात घडलेला गंभीर गुन्हा आहे', असे निरीक्षण नोंदवले होते. त्यानंतर लगेच ४ दिवसांनी, म्हणजे १६ फेब्रुवारी या दिवशी लवादाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील ६ सदस्यांच्या एका स्वतंत्र विशेष खंडपिठाने 'या प्रकल्पामुळे जागतिक स्तरावर अद्वितीय जैवविविधतेच्या आकर्षण केंद्राला धोका आणि आदिवासी समुदायांचे विस्थापन असूनही प्रकल्पाचे सामरिक अन् राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन त्यात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही चांगले कारण आढळले नाही', असे सांगून या विरोधावर पडदा पाडला. वास्तविक राष्ट्रहिताला प्राधान्य देत पर्यावरणाच्या हितांना बाजूला सारण्याची लवादाची ही काही पहिलीच वेळ नाही. उत्तराखंडमधील चारधाम प्रकल्प, केन-बेटवा प्रकल्प, अनेक औष्णिक वीज प्रकल्प यांच्या वेळी लवादाने विकासाला झुकते माप दिले आहे. अशा निर्णयांचे समर्थन करण्यासाठी लवाद नेहमीच 'शाश्वत विकास' ही संकल्पना वापरते. लवादाच्या मते पर्यावरण, संरक्षण आणि आर्थिक वाढ एकत्र असायला हवी. 'एखाद्या प्रकल्पाविषयी धास्ती बाळगून त्याला विरोध करण्याऐवजी संतुलित दृष्टीकोन आवश्यक आहे', असे मत लवादाने ग्रेटर निकोबार प्रकल्पाला मान्यता देतांना नोंदवले होते. केवळ भारतच कशाला जगभरात जे विकसित देश आहेत, ते पर्यावरण आणि विकास यांचा समतोल साधून विकास करण्याचा प्रयत्न करतात. विकासाच्या संदर्भात भारत आणि चीन यांची नेहमीच तुलना होते; मात्र हा विकास साधण्यासाठी चीनने कशा प्रकारे लोकांना निर्वासित केले, किती गावांतून लोकांना हाकलले, हे आपल्याला ठाऊक आहे का? चीनने जसा विकास साध्य केला, तसा आपल्याला नक्कीच नको. विकास साध्य करतांना संवेदनशीलता दाखवायलाच हवी आणि पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी उपायही काढायला हवेत. ग्रेटर निकोबारमधील पर्यावरणाची रचना पहाता सरकारने संवेदनशीलता दाखवणे आवश्यक आहे. 'विकास करण्यासाठी पर्यावरण समतोल जातोच', हे वारंवार सांगितले जाते. याला छेद देऊन सरकारने पर्यावरण आणि प्रकल्प यांचा समतोल राखावा. चीनचा विस्तारवाद पहाता या प्रकल्पात तो अनेक अडथळे निर्माण करील, तसेच भारताला या समुद्री परिसरात शह देण्यासाठी अन्य पर्यायांचा अवलंब करील. त्यामुळे प्रकल्प उभारण्याचा मार्ग मोकळा झाला; म्हणून हुरळून जाण्याची आवश्यकता नाही. हा प्रकल्प गतीने पूर्ण करण्याचे आव्हान केंद्र सरकारवर असणार आहे. वास्तविक चीनच्या युद्धानंतर त्याचे मनसुबे लक्षात आलेच होते. त्याच वेळी तत्कालीन काँग्रेस सरकारने त्याला रोखण्यासाठी काय प्रयत्न केले? आता रोखण्यासाठी प्रयत्न होत असतांना त्याला विरोध करणे, हाच मुळात राष्ट्रघात आहे!

# मराठी-भाषा व समाजसंस्कृती



भाषा स्वतंत्र नसते. ती समाजसंस्कृतीचा भाग असते. त्यामुळे मराठी भाषेचा गौरव दिन म्हणजे मराठी समाजाचा, मराठी संस्कृतीचा गौरव दिन म्हटला पाहिजे व आपल्यापैकी प्रत्येकाला जसा स्वतःच्या नाव-आडनावाचा म्हणजे घराण्याचा, जातीचा अभिमान असतो, तसा तो आपल्या मराठीपणाचाही वाटला पाहिजे. खरे तर, तो प्रत्येकाच्या मनात असतोही. 'मराठी मन' म्हणून त्याला उजळा द्यायचे ठरवले तर स्वाभाविकपणे आठवू लागतात - ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी, बाजीराव असे इतिहासपुरुष आणि महाराष्ट्राची स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरी म्हणून जांभेकर ते आंबेडकर येथपर्यंतची प्रबोधन परंपरा. या सर्व मंडळींनी त्यांच्यावर जी जबाबदारी इतिहासक्रमात आली, ती पूर्ण सामर्थ्याने निभावली (शिवाय पोवाडा, लावणी यांसारख्या कला विकसित झाल्या). त्या साऱ्यांच्या लेखी महाराष्ट्र, मराठी भाषा असा विषय नव्हता. संतांना व वीरपुरुषांना तत्कालीन जे युद्धग्रस्त वातावरण होते त्यास त्यांच्या परीने तोंड द्यायचे होते अथवा त्यावर मात करायची होती.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, महाराष्ट्र राज्याची स्थापना संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातून (१९५०-६०) झाली तेव्हा आणि शिवसेना १९६६च्या सुमारास स्थापन झाली तेव्हा... अशा दोन वेळा महाराष्ट्राचा व मराठी माणसाचा हुंकार ऐकू आला. राज ठाकरे विभक्त झाले व त्यांनी चार-पाच कोटी रुपये खर्च करून शिवाजी पार्कवर सभा घेतली तेव्हा ते काही प्रेरक वाक्ये बोलले होते, जसे की 'माझा शेतकरी जीन पँट घालून शेती करील' वगैरे - त्यात मराठीपण व आधुनिक दृष्टी दिसली. तेव्हाही मराठी सुशिक्षितांची उमेद जागी झाली होती... पण ती किती फसवी आहे हे लवकरच लक्षात आले व राज ठाकरे 'एंटरटेनर' म्हणून मनावर बिंबले ते कायमचे - लाव रे तो व्हिडिओ...

मराठी अस्मिता प्रकट झाल्याचे एरवी कधी जाणवले नाही. हे खरे, की गेल्या शंभर वर्षांमध्ये मराठीच्या स्थितिगतीवर अनेक विद्वानांनी अनेक वेळा भाष्य केले आहे, किंबहुना कुसुमाग्रजांनी मंत्रालयासमोर उभ्या, राजमुकुट घातलेल्या दीनवाण्या मराठी भाषादेवतेचे वर्णन १९८९ मध्ये केले, ते राज्यकर्त्यांना फार बोचले, मग त्यांनी कुसुमाग्रजांचा जन्मदिन हा मराठी भाषादिन म्हणून जाहीर केला. त्यामुळे मराठी भाषा विभागाला आणि मराठी भाषेत काम करणाऱ्या शेकडो साहित्यिक-प्राध्यापक-पत्रकारांना तो मानधनासहित साजरा करता येऊ लागला.

मराठी भाषेचा उद्धार त्यातून किती झाला ते नाही सांगता येणार, पण मधल्या काळात दोन वर्षांपूर्वी मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राज्य सरकारने मराठी विद्यापीठाची स्थापना केली, आता अनुवाद अकादमी अस्तित्वात आली आहे. मराठीबद्दल आस्था आणि मराठीचे प्रेम असलेला साहित्यिक वृत्तीचा किरण कुळकर्णी यांच्यासारखा उच्चाधिकारी विभागाला लाभला आहे आणि सामाजिक व सांस्कृतिक संवेदना असलेले आशीष शेलार व उदय सामंत हे मंत्री संबंधित खात्यांना जबाबदार आहेत. त्यामुळे मराठीचा दणका वाढत आहे - त्यातून विश्वभाषा संमेलने, भाषाविषयक दिन व सप्ताह-पंधरवडे साजरे होत आहेत. मराठी लेखक-प्रकाशक यांना सन्मानपदके लाभत आहेत. मराठी भाषाप्रेम हा अशा तऱ्हेने एक राजकीय मुद्दा होऊन तो सरकारी यंत्रणेत अचूक ठिकाणी जाऊन बसला आहे. परिणामतः भाषेवर प्रेम करणारे ठाकरे बंधू, भाषेचे राजकारण करू इच्छिणारे दीपक पवारसारखे विद्वान प्राध्यापक आणि सरकारला 'याही मुद्यावर विरोध करून पाहू' असे म्हणणारे डावे पक्ष एकत्र येऊन सत्तारूढ पक्षाला कात्रीत पकडण्याची संधी साधू पाहत आहेत.

मराठी भाषेचे 'मीडिया'तून प्रकटणारे वर्तमान असे आहे. वास्तवात महाराष्ट्राच्या सुमारे बारा कोटी जनतेला मराठी भाषेबद्दल आत्मीयता असली तरी तिला आधुनिक तंत्रसज्ज जगात आधुनिक मूल्यांसह जगण्याची इच्छा जास्त आहे. 'हिंदी-तिसरी भाषा' या मुद्यावरून वादळ माजले, मोर्चे निघाले, तेव्हा ते संघटित राजकारण होते - त्यात मीडिया सहभागी होता हे आमजनांनी जाणले व त्याचबरोबर त्यांचे हित-अनहित त्यात गुंतलेले नाही हे त्यांना कळले होते. एक साधा मुद्दा घेऊ. मराठी शाळा बंद पडत आहेत व इंग्रजी शाळा वैभवाप्रद जात आहेत. तरीसुद्धा मराठी शाळा चालू ठेवण्याचा अट्टहास करता येईल का? ध्येयप्रेरित अनेक शाळा-संस्थांच्या हकिगती समोर आहेत - ठाण्याच्या 'सरस्वती मंदिर'ची लढाई ही त्यांतील शेवटची. तरी गेल्या आठवड्यात मराठी शाळा चालू ठेवण्यासाठी कोठेतरी मोर्चा निघाल्याचे वाचले! मराठीच्या या राजकारणात गेल्या वर्षातील एक मोठी घटना आपल्याकडून दुर्लक्षित झाली. पिंपरी-चिंचवड कॉलेजमधून पूर्णतः मराठी माध्यमातून पदवीधर झालेली साठ संगणक अभियंत्यांची एक तुकडी ठिकठिकाणी नोकऱ्यांना लागली. त्यांना पंधरा ते पंचेचाळीस लाख रुपयांची पॅकेजेस मिळाली. त्यातील एका मुलीचे नाव आहे सुफिया सय्यद. ती साठ मुले वीस जिल्ह्यांतून आलेली आहेत.

वास्तविक मराठीचा मुद्दा १९७०च्या दशकात पुढे आला, तो मराठी विषय घेणारी कॉलेजांतील मुले कमी होऊ लागली तेव्हा. मुंबई विद्यापीठाने मराठी विभाग हवेत कशाला, अशी भूमिका घेतली. त्याविरुद्ध आंदोलन संघटित केले लाला लजपतराय कॉलेजमधील प्राध्यापक दत्ता पवार यांनी. त्यांनी वर्तमानपत्रांत लेख लिहिले - परिषद योजली. अनंत काणेकर, मे.पुं. रेगे, श्री. पु. भागवत, विद्याधर पुंडलिक असे मातब्बर लोक सहभागी झाले. आणि तेव्हापासून मराठीबद्दलची जागृती सुरू झाली. तशा अनेक बैठकांना मी गेल्याचे मला आठवते. त्याचे सर्वोच्च टोक गाठले गेले ते शरद पवार व मनोहर जोशी या दोघांच्या एकत्र नेतृत्वाखाली तीन दिवसांची जंगी जागतिक मराठी परिषद (जामप) षण्मुखानंदमध्ये भरली तेव्हा. जगातील मराठी 'क्रीम' तेथे एकत्र झाले. लता मंगेशकर, सुनील गावसकर, कुसुमाग्रज, पुलं... अशी सारी मंडळी स्टेजवर. वसंत बापट निवेदन करण्यासाठी. तेथे जी मांदियाळी जमली आणि कार्यक्रम झाले ते आठवले तरी अंगावर रोमांच उभे राहतात. मॅक्सीम बर्नसन सारखे देशोदेशीचे विदेशी मराठी अभ्यासक वेगवेगळ्या कार्यक्रमांत होते - विनय नेवाळकरने कलाप्रदर्शनातून चित्रकला-चित्रपट-नाटक यांचा मराठी इतिहास नेहरू सेंटरमध्ये उभा केला होता. मराठीचे वैभव तेव्हा पाहिले. तेव्हा मराठीचा गौरव झाला तो शेवटचा!

सुरेश खरे व जुई मेहता यांनी तेथे नव्याने आलेल्या ऑडिओ व्हिज्युअल माध्यमात 'मराठी माणूस' सादर केला, तेव्हा 'आमची कोठे शाखा नाही' आणि 'दुपारी आमच्या दुकानाची विश्रांतीची वेळ असते' ही पुणेरी मराठी व्यापाऱ्यांची वैशिष्ट्ये पक्की नोंदली गेली व त्याबरोबर मराठी स्वभावही. त्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत अभिमान वाटावा असे मराठीचे काही कर्तृत्व राष्ट्रीय वा जागतिक पटलावर नोंदले गेलेले दिसले नाही. मात्र आपण घरात मुलानातवंडांच्या कामगिरीचे कौतुक करतो तसे खूप सांगता येईल.

आपण म्हटले आहे, की भाषेला स्वतंत्र अस्तित्व नसते, ती संस्कृतीशी जोडलेली असते. 'जागतिक मराठी परिषदे'च्याच काळातील गोष्ट. मुले परदेशी जाऊ लागली होती. स्वाभाविक तिकडे महाराष्ट्र मंडळे 'स्ट्राँग' होऊ लागली. तेथील चर्चेचा एक मुद्दा असा, की आमची मुले मराठी आहेत. कारण की ती दिवसभर कोठे थकून आली, की संध्याकाळी पिठलंभात खातात! ही गोष्ट कितपत प्रातिनिधीक आहे ते अलाहिदा, परंतु भाषा हे संस्कृतीचे लक्षण असते आणि जर आपल्याला मराठी भाषा वैभवाप्रद नेणे असेल तर मराठी संस्कृतीची लक्षणे सुदृढपणे मांडावी लागतील.



# मनमानीला वेसण

भारतासह अनेक देशांवर आयातशुल्क लागू करण्याचा अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, ही अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी कारभाराला दिलेली चपराक आहे. आपत्कालीन कायद्याचा आधार घेऊन अनेक देशांवर आयातशुल्क लागू करण्याचा सपाटा ट्रम्प यांनी लावला होता; या निर्णयाने त्याला वेसण घातली. सन १९७७च्या 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पा-वर्स ॲक्ट'चा वापर ट्रम्प यांनी त्यासा-ठी केला होता. मात्र, अध्यक्षांना तसा अधिकार नसल्याचा निर्णय न्यायालयाने सहा विरुद्ध तीन अशा बहुमताने दिला. यामुळे अहंकार दुखावलेले ट्रम्प हा निर्णय सहजी स्वीकारणार नसल्याचेच त्यांच्या भूमिकेवरून दिसते. त्यांनी नव्याने १५ टक्के अतिरिक्त व्यापारशुल्क लागू केलेच; त्यासह काँग्रेसची मान्यता मिळवून, अथवा अन्य वेगवेगळ्या कायद्यांचा आधार घेऊन ते सध्याची शुल्करचनाही कायम ठेवण्याचा प्रयत्न करतील. हे असले, तरी विविध देशांना अनिश्चिततेच्या गर्तेत लोटून गेले वर्षभर साऱ्या जगाला वेठीस धरणारे ट्रम्प यांचे लेखणीच्या एका फटकाऱ्याद्वारे उपसले जाणारे आयातशुल्काचे हत्यार न्यायालयाच्या या निर्णयाने बोथट झाले, हे निर्विवाद. अंतिम टप्प्यावर असलेल्या भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारावर या निर्णयाचे काय परिणाम होणार आणि बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन भारत नव्याने वाटाघाटी करणार का, ही आता उत्सुकतेची बाब आहे. जागतिक व्यापार आणि धोरणात्मक संबंध या खरे तर गंभीरपणे हाताळण्याच्या बाबी; पण मुळातच लहरी कारभारासाठी प्रसिद्ध असलेले ट्रम्प यांच्या हाती आलेल्या आयातशुल्कनामक हत्याराचा गेले वर्षभर त्यांनी खेळण्यासारखाच वापर केला. कधी द्विपक्षीय व्यापारातील अनुशेष भरून काढण्याच्या निमित्ताने, तर कधी रशियन तेलाची खरेदी करतो आणि युद्धाला मदत करतो, असा ओरडा करून त्यांनी भारतावरही एकूण ५० टक्के आयातशुल्क लादले होते. आयातशुल्काद्वारे दबावतंत्र वापरून आपल्या अटी त्यांनी अनेक देशांच्या गळी उतरवल्या. चीनसारख्या देशांनी फणा उगारल्यानंतर त्यांनी माघारही घेतली. आणीबाणीच्या प्रसंगी वापरले जाणारे आर्थिक अधिकार शांतताकाळात वापरता येणार नाहीत, हा मूळ भारतीय अमेरिकी नागरिक नील कत्याल यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. या निर्णयानंतरही आपला हेका सोडणार नसल्याचे ट्रम्प यांनी न्यायमूर्तींवरच टीका करून दाखवून दिले आहे. त्यांनी लागू केलेल्या १५ टक्के अतिरिक्त शुल्काचीही मुदत सहा महिन्यांचीच आहे. आता पूर्वी लागू केलेल्या शुल्कविषयक तरतुदींना मान्यता घेण्यासाठी त्यांना काँग्रेसपुढे जावे लागेल. मात्र, खुद्द रिपब्लिकन पक्षातही आयातशुल्काला अनेकांचा विरोध आहे. या मंथनातून नेमके काय समोर येणार, याविषयी संभ्रम आहे; तसेच 'बेकायदा' वसूल केलेल्या सुमारे १३३ अब्ज डॉलरच्या शुल्काचा परतावा देण्याबाबत न्यायालयाने काही भाष्य केलेले नाही. कायद्यानुसार आजवर काँग्रेसने मान्य केलेले आयातशुल्क आणि दहा टक्के इतके अतिरिक्त शुल्क सध्या तरी लागू असल्याचे 'व्हाइट हाउस'च्या प्रवक्त्यांचे म्हणणे ट्रम्प हे जोवर नवा अगोचरपणा करीत नाहीत, तोवर सत्य मानावे लागेल, असे दिसते. भारताविरोधातही ट्रम्प यांनी आयातशुल्काचा मनमुराद वापर केला. भारत-अमेरिका व्यापारकरारातील तरतुदींबाबत, विशेषतः भारतीय मालावर १८ टक्के आणि अमेरिकी मालावर शून्य टक्के आयातशुल्काबाबत ट्रम्प यांनी केलेले भाष्य पाहता, हा करार अमेरिकेच्या फायद्याचा आणि एकतर्फी असल्याची टीका विरोधकांकडून सुरू आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतरही 'भारत-अमेरिका करार कायम आहे. अमेरिका शुल्क देणार नाही आणि भारत देणार आहे,' या ट्रम्प यांच्या विधानाने त्यात भरच पडणार आहे. अमेरिकी न्यायालयाचा निर्णय एका अर्थाने भारताच्या पथ्यावर पडणारा आहे. त्यामुळे बदललेल्या संदर्भानुसार ट्रम्पप्रणित शुल्कपूर्व स्थिती गृहीत धरून आणि अद्याप अंतिम न झालेल्या कराराबाबत दबाव झुगारून अधिक आक्रमकपणे वाटाघाटी करण्याची वेळ आली आहे. मात्र, एपस्टिन फाइलवरून होणारी टीका, गाझा शांतता मंडळावरून मतमतांतरे आणि इराणवर हल्ल्यांची तयारी अशा परिस्थितीत न्यायालयाच्या निर्णयाने कातावलेले आडमुठे ट्रम्प पोतडीतून नवे कोणते अस्त्र बाहेर काढणार, याचाही विचार करावा लागेल.

# पुस्तक महोत्सव झाले उदंड, वाचणारे मात्र थंड!

**भारताप्रमाणे अमेरिका, इंग्लंड, जर्मनी येथेही केवळ आनंद घेण्यासाठी पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या आता कमी कमी होत आहे. आता पुस्तकांची खरेदीही मोठ्या प्रमाणात समाजमाध्यमांवर भरवसा ठेवून केली जाते. अलीकडे मोठ्या प्रमाणात पुस्तक महोत्सव भरविण्यात येत असले तरी तिथे पुस्तकांना मोठे स्थान नसते. म्हणजे लेखकांच्या मुलाखती वा चर्चा, भाषणे, लेखकाची स्वाक्षरी किंवा त्याच्याबरोबर सेल्फी घेण्याला प्राधान्य देण्यात येते.**



अलीकडील काही वर्षांत मोठ्या शहरांत, बुक फेअर वा फेस्टिवल-पुस्तक महोत्सव-बुक फेअर अशा नावांनी होणाऱ्या या कार्यक्रमांचा हेतू लोकांनी पुस्तकांकडे, खरे तर पुस्तके वाचण्याकडे वळावे, त्यांनी पुस्तके विकत घेऊन वाचावीत, हा असतो. भारतातील महोत्सवांची संख्या आता दहावर गेली आहे. जयपूर, कोलकाता, केरळ, दिल्ली, पुणे इत्यादी ठिकाणी हे महोत्सव होतात. कालावधी साधारण एक आठवडा वा दहा दिवसांचा असतो. जयपूरचा महोत्सव सर्वात मोठा, तर कोलकाता येथे सर्वाधिक लोक येणारा, असा त्या दोन महोत्सवांचा लौकिक आहे. तर दिल्लीचा महोत्सव विविध प्रकाशकांत भाषांतराचे जास्तीत जास्त करार होण्यासाठी प्रसिद्ध आहे. त्यांना प्रतिसाददेखील चांगला असतो. पुस्तकांची विक्रीही लाख, कोटी रुपयांच्या घरात पोहोचल्याच्या बातम्याही प्रसिद्ध होतात. गेली तीन वर्षे पुण्यातही लिट फेस्ट होत आहे.

दरवर्षी होणारी गर्दी वाढतच आहे. तेथील उलाढाल लाखांवरून आता कोटी रुपयांवर गेली आहे, म्हणजे ती दरवर्षी वाढतच आहे. पण नीटपणे पाहिले, वाचले तर दिसते की, या महोत्सवांत साहित्य, पुस्तके यांना मोठे स्थान नसते. असते तेही दुय्यम. म्हणजे लेखकांच्या मुलाखती वा चर्चा, भाषणे, लेखकाची स्वाक्षरी किंवा त्याच्याबरोबर सेल्फी घेण्यासाठी. त्यात देशोदेशीचे नामवंत लोकप्रिय लेखकही सहभागी होतात. वाचकांना (?) सामोरे जातात. पण त्यांना दिलेला वेळ कमी असतो. पुस्तकांवर त्यांची स्वाक्षरी मिळवण्यासाठी, त्यांच्याबरोबर सेल्फी घेण्यासाठी ही चुरस असते. त्यासाठी मोठ्या रांगा लागतात. त्यामुळे पुस्तकविक्रीही चांगली होते, हीच त्यातली जमेची बाजू म्हणायची. विविध भाषांतील पुस्तकांचे भाषांतर हक्क मिळवण्यासाठी करार होतात. पण ती भाषांतरेही बहुतेकदा खपाऊ पुस्तकांची असतात. त्यात दर्जेदार पारितोषिक विजेत्या पुस्तकांची दखल फारशी घेतली जात नाही, त्यामुळे त्यांची संख्या खूपच कमी असते.

'द गार्लिक रेव्होल्यूशन' नावाचे एका चिनी लेखकाचे पुस्तक वाचले होते. त्यात सरकारच्या आदेशावरून लसणीची लागवड मोठ्या प्रमाणात होते, पण भरमसाठ उत्पादन मिळाल्यानंतर ते खरेदी करण्यात सरकारची अळंटळं चाललेली असते, मोठ्या उत्पन्नाची हमी आणि सरकारचे आश्वासन यामुळे ही लागवड केलेली असते. पण सरकारच्या वेळकाढूपणाने शेवटी लोकांचा संयम संपतो आणि ते उठाव करून खरेदीकेंद्रालाच आग लावतात. तेथील कर्मचाऱ्यांनाही बडवतात. इत्यादीचे वर्णन वाचून आपल्याकडील सोयाबीन, कांदा उत्पादकांची दयनीय अवस्था आठवते. पण त्या पुस्तकाचे भाषांतर आपल्याकडे कोणी केल्याचे पाहण्यात नाही.

या महोत्सवांमध्ये त्यांच्या मोजक्या कालावधीत शेकडो कार्यक्रम आयोजित करतात. त्यात संगीत, चित्र-शिल्पकला, नाटके, चर्चा, मुलाखती, चर्चा इत्यादींचा समावेश असतो. एखादा प्रेक्षक महोत्सवाचे सर्व दिवस उपस्थित राहिला, तरी त्याला सर्व कार्यक्रम बघता, ऐकता येणे अशक्य. कारण एकाच वेळी अनेक ठिकाणी कार्यक्रम सुरू असतात. तरीही दरदिवशी या कार्यक्रमांना मोठी गर्दी असते. नवनवीन लोक येतात, काहीजण पुन्हा पुन्हा येतात. त्यामुळे कार्यक्रमांना कमी जास्त संख्येने प्रेक्षक असतातच. पण या अशा कार्यक्रमांना हजेरी लावणाऱ्यांच्यात खऱ्या वाचकांची संख्या किती, हा प्रश्न अनाठायी वाटेल. पण तो तसा नाही. सर्व जगाचीच प्रवृत्ती, संस्कृती आता पैसाकेंद्रित झाली आहे. तेथे वाचकांचा वापर हा केवळ बद्धिवंतांची गर्दी होते, हे दाखवण्यासाठी करण्यात येतो.

अनेक प्रेक्षकही प्रामुख्याने समाज माध्यमांचा वापर आपण किती मोठे आहोत, हे दाखवण्यासाठी करतात. म्हणजे पुस्तक हे फक्त काहीतरी वाचण्यासाठी ही संकल्पनाच बदलली आहे. आता ते केवळ प्रदर्शन, दिखावा करण्यासाठी, अभिमानाने मिरवण्यासाठी आणि लोकांचे, माध्यमांचेही लक्ष स्वतःकडे वेधून घेण्यासाठी वापरण्यात येते. आता परफॉर्मेटिव्ह रीडिंग, म्हणजे पुस्तक वाचनाचा कार्यक्रम, असे ज्याचे नामकरण करण्यात आले आहे तो प्रकार वेगळाच आहे, असे म्हणता येईल. कारण यात वेळेची मयार्दा असल्याने संपूर्ण पुस्तक न वाचता, वेगवेगळ्या पुस्तकांतील एखादा अंशच वाचला जातो. विजय आणि वीण देव, त्यांच्या जावयाच्या साथीने कादंबरी वाचन करत असत. अर्थात कादंबरीची संक्षिप्त आवृत्ती असायची त्याप्रमाणे ते पुस्तकाचे संपादन करून ते आटोपशीर होईल, त्यामुळे ते लांबल्यासारखे होणार नाही, याची दक्षता घेत. पण त्यामुळे मूळ पुस्तक वाचण्याची इच्छा कार्यक्रमाला आलेल्या श्रोत्यांची होत असे. अर्थात वाचण्याची सवय नसलेल्यांनाही हे कार्यक्रम आवडत कारण त्यांची तहान तेवढ्यावरच भागत असे.

भारताप्रमाणे अमेरिका, इंग्लंड, जर्मनी येथेही केवळ आनंद घेण्यासाठी पुस्तके वाचर्णायांची संख्या आता कमी कमी होत आहे. वाचनासाठी देण्यात येणारा वेळही कमी झाला आहे. आता पुस्तकांची खरेदीही मोठ्या प्रमाणात समाजमाध्यमांवर भरवसा ठेवून केली जाते. समाज माध्यमांवर आनंदासाठी वाचण्याऐवजी कार्यक्रमांचा-परफॉर्मन्सचा आनंद घेण्याला झुकते माप देण्यात येते. म्हणजे काही मान्यवरांनी वेगवेगळ्या पुस्तकांतील उतारे वाचण्याच्या कार्यक्रमांचे प्रमाण महोत्सवांत वाढले आहे. याबरोबरच पुस्तक परीक्षण ऑनलाईन केले जाते. त्याचा प्रभावही पुस्तक विक्रीवर पडतो. हे चांगलेच आहे. बाजार-मार्केट-डोळ्यापुढे ठेवून पुस्तक निर्मिती केली जाते. पुस्तकाची कव्हर्स-मुखपृष्ठेही, आकर्षक करण्याकडे कल वाढतो आहे. धीट आणि विविधरंगी होत आहेत. हे सारे विक्री डोळ्यापुढे ठेवूनच करण्यात येते. याला एक सांस्कृतिक पदरही आहे. एखादे चित्र, प्रतिमा घेताना भोवताली पुस्तकांचे व्यवस्थित मांडलेले ढीग नीटपणे दिसतील, अशा प्रकारेच मांडणी केलेली असते. त्यात बाजूला वाचणारा, वाफाळलेली कॉफी वा अन्य पेयाचा मगही दिसतो. कधी शेजारी किंवा मागील बाजूला पुस्तकांनी भरलेले शेल्फही दिसते. हे सारे आपण किती मोठे वाचक आहोत हे बघणाऱ्यांच्या मनावर बिंबावे यासाठी केलेले असते.

खरे वाचक कोण? तर केवळ वाचनासाठीच पुस्तके घेणारे, ग्रंथसंग्रहालयातही जातात, कारण तेथे दुर्मिळ पुस्तके बाहेर नेऊ दिली जात नाहीत. उदा. गोविंदराव तळवलकर, डॉ. रा. चिं. ढेरे, झुंडीचे मानसशास्त्र लिहिणारे विश्वास पाटील, डॉ. अरुण टिकेकर, कुमार केतकर, साहित्य संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, निरंजन घाटे, अशी बरीच नावे सांगता येतील. आपण काय कोठे वाचले आहे, हेही त्यांच्या स्मरणात असते. हे लोक खूपच भरभर वाचतात, इतके की, पाहणाऱ्यांना वाटते. ते केवळ पुस्तक चाळताहेतच की काय, पण त्यांनी ते संपूर्ण वाचून ध्यानात ठेवलेले असते.

लोक वाचनापासून दूर जात आहेत. त्यांना वाचाल तर वाचाल असे सांगण्याची वेळ येत आहे. याला कारण आहेत प्रसार माध्यमे. त्यामुळे आता पुस्तकांचे उतारे वाचण्याचे कार्यक्रम अधिकाधिक होत आहेत. अशा कार्यक्रमांना जार्णयांचा, ते बघणाऱ्यांचा, बऱ्याचदा गैरसमज असतो की या कार्यक्रमांना गेले म्हणजे, प्रत्यक्ष पुस्तक वाचण्याची आवश्यकता नाही. उपाहारगृहांत, कॅफेमध्ये वा वाहनांत वाचन करर्णायांकडे आजूबाजूच्या लोकांकडून संशयाने पाहिले जाते. संशय घेर्णायाचा समज असतो की, अशा गजबजलेल्या ठिकाणी तो आरामात वाचत बसला आहे, त्यामागे त्याचा निश्चितपणे काहीतरी हेतू असणार. अशी प्रतिक्रिया ही आता नैसर्गिक बाबच बनली आहे. खरे तर बऱ्याचजणांना अशी सवय असते. ते अगदी मनापासून वाचत असतात.

खरे तर वाचत असत, असेच म्हणायचे. कारण ही गोष्ट समाज माध्यमांनी पकड घेण्यापूर्वीची आहे. आता वाचन म्हणजे समाज माध्यमांवर कुणी काय लिहिले आहे, त्याला किती लाईक्स मिळाल्या आहेत, त्यावर कोणी काय प्रकारच्या टिप्पणी केल्या आहेत हे पाहण्यासाठीच असते. मात्र समाज माध्यमांवरील साराच मजकूर काही दुर्लक्ष करण्याजोगा नसतो. कारण जग बदलते आहे. अशा परिस्थितीत ऑनलाईन वाचक गटांमुळे एक पर्याय मिळावा हा कमी होर्णाया खर्याखुर्या वाचन संस्कृतीला हा दिलासाच. महत्त्वाची बाब अशी की, यातील बरीच पुस्तके म्हणजे क्रिएटिव्ह म्हणजे सर्जनशील, जी आपल्याला खिळवून ठेवतील. त्यांच्यात सामावून घेतील अशी नाहीत. त्यामुळे वाचक वाढण्याऐवजी कमी होण्याचीच भीती असते. वाचन मग ते व्यक्तिशः असो, खासगी असो किंवा सामाजिक असो ते केवळ पुस्तक वरवर चाळणे नसते, हे लक्षात ठेवायला हवे. तरीही या महोत्सवांतून या प्रकारचे जास्तीत जास्त खरेखुरे वाचक निर्माण होवोत असेच कुणालाही वाटेल.

**आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

# फेशियल करताना अशी घ्या काळजी



**काही** लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात.

तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले.

फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा.



फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो.

तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा. फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात.

फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

# घरचा वैद्य
## जाणून घ्या ५ उपाय

▮ **कांदा** – कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.



▮ **हळद** – शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीरावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** – हे अँटीबॅक्टेरिअल आणि अँटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

▮ **लवंग** – दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** – याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्त्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

**कधीतरी उपमा जास्त होतो आणि उरतो. मग तो गारगुट्ट उपमा कोणीच खात नाही. काही वेळा ताजा उपमाही उरतो. कारण तो दडदडीत किंवा घट्ट होतो जो अजिबात खाल्ला जात नाही. अशा वेळी हा उपमा फुकट घालवण्यापेक्षा त्यापासून एक भन्नाट नाश्त्याचा पदार्थ बनवला तर...**

# उपमा कटलेट्स



**साहित्य** – उरलेला उपमा १ वाटी (त्यात काजू असतील तर काढून टाका.) उकडलेला आणि किसलेला बटाटा अर्धी वाटी, चाट मसाला, आवडीप्रमाणे तिखट, थोडा ओवा, मीठ, साखर.

**कृती** – सर्व साहित्य एकत्र करून घ्यावे. लक्षात ठेवा मिश्रण पातळ नको तर घट्ट हवं. त्याचे छोटे छोटे गोळे अथवा टिक्की करून आवडीप्रमाणे तळून किंवा भाजून घ्यावे. याच्या टिक्की किंवा कटलेट नीट वळता येत नसतील तर अर्धा तास ते मिश्रण फ्रीजमध्ये उघडे ठेवावे.

# कर्करुग्णांसाठी जीवनसत्त्व 'ड' लाभदायक

कर्करोग झालेल्यांनी किमान तीन वर्षे नियमितपणे जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेतल्यास ते जगण्याचा कालावधी आणखी काही वर्षे वाढू शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत अमेरिकेतील मिशिगन स्टेट विद्यापीठातील संशोधकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जीवनसत्त्व 'ड'मुळे हाडे मजबूत होण्याबरोबरच आणखीही महत्त्वपूर्ण लाभ होतात.

मिशिगन स्टेट विद्यापीठाचे तारेक हायकल यांनी सांगितले की, जीवनसत्त्व 'ड'च्या सेवनामुळे कर्करोग झालेल्या व्यक्तींमध्ये मृत्यूची जोखीम कमी झाल्याचा परिणाम चांगल्या प्रकारे दिसून येतो. पण त्याच वेळी या जीवनसत्त्वामुळे कर्करोगाला प्रतिबंध होऊ शकतो, असे दाखवणारा कोणताही पुरावा मिळू शकलेला नाही.

या संशोधकांनी कर्करोग प्रतिबंधाचे उपचार झालेल्या ७९ हजारांहून अधिक रुग्णांची माहिती तपासली. ही माहिती विविध अभ्यासात नोंदवण्यात आली होती. या अभ्यासात जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार घेतलेल्या रुग्णांची तुलना करण्यात आली होती. हा कालावधी किमान तीन वर्षांचा होता. यात कर्करोग झाल्यानंतर मृत्यू झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.



या संशोधनात असे दिसून आले की, जीवनसत्त्व 'ड' घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार केलेले रुग्ण यांच्यातील मृत्यूच्या प्रमाणात मोठा फरक आहे. जीवनसत्त्व 'ड' हे कर्करुग्णांसाठी किती महत्त्वपूर्ण ठरते, हे यातून दिसून आले, असे हायकल म्हणाले. असे असले तरी जीवनसत्त्व 'ड'ची नक्की किती मात्रा घ्यावी आणि त्याची रक्तातील पातळी किती असावी, ही माहिती यात मिळाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# व्हॉट्सअ‍ॅपवर 'या' नंबरवरून फोन आला तर अजिबात उचलू नका! बँक अकाऊंट होईल रिकामे

व्हॉट्सअ‍ॅपचा वापर आपण सर्वच जण मोठ्या प्रमाणात करत असतो. एक इन्स्टंट मेसेजिंग ॲप म्हणून व्हॉट्सअ‍ॅप बेस्ट आहे. आपल्या नॉर्मल गप्पाटप्पांपासून ते ऑफिसची महत्त्वाची कामेही आपण या व्हॉट्सअ‍ॅपवर करत असतो. पण हे ॲप जेवढं उपयुक्त आहे तेवढंच धोकादायक आहे. आजकाल व्हॉट्सअ‍ॅपद्वारे कितीतरी स्कॅम होत असून अनेकजण यात फसले जात आहेत. आता आणखी एक नवीन प्रकरण समोर आले आहे. अनेकांना आंतरराष्ट्रीय नंबरवरून अचानक कॉल येत आहेत.

**जर तुम्हाला देखील सतत काही ठरावीक आंतरराष्ट्रीय नंबर्सवरून व्हॉट्सअ‍ॅपवर कॉल किंवा मेसेज येत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे. कारण हा तुमच्यासोबत स्कॅम असू शकतो.**

हे कॉल्स इथिओपिया (+251), मलेशिया (+60), इंडोनेशिया (+62), केनिया (+254), व्हिएतनाम (+84) आणि इतर यांसारख्या वेगवेगळ्या देशांचे आहेत. तर व्हॉट्सअ‍ॅप कॉल हे इंटरनेटद्वारे केले जातात. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही स्कॅम एजन्सी कार्यरत आहेत ज्या व्हॉट्सअ‍ॅप कॉलसाठी आंतरराष्ट्रीय नंबर विकत आहेत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॉल शुल्काची चिंता न करता या क्रमांकांवरून कॉल करू शकतात. अशाप्रकारच्या कॉल्समुळे तुमचा फोन हॅक होऊ शकतो, तुमचे बँकिंग डिटेल्सही समोरच्यांकडे जाऊ शकतात आणि तुमचं बँक खातं मोकळं होऊ शकतं. ट्विटरवरील अनेक वापरकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय नंबरवर एकापेक्षा जास्त वेळा कॉल येत असल्याचं सांगितलं आहे. जर तुमच्या बाबतीतही असेच होत असेल आणि तुम्हाला या समस्येपासून मुक्ती मिळवायची असेल, तर तुम्हाला या नंबरवरून येणाऱ्या कॉल्सकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर तुम्हाला अचानक एखाद्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून कॉल दिसला तर तो ताबडतोब डिस्कनेक्ट करा. हा नंबर देखील ब्लॉक करा. ते तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतात आणि तुम्ही तुमचे बँक खाते साफ करू शकतात.



## हा व्हॉट्सअ‍ॅप स्कॅमही चर्चेत

लोकांना व्हॉट्सअ‍ॅप मेसेजद्वारे नोकऱ्या दिल्या जात असल्याचे मेसेज येत आहेत. हे लोक कोणत्या ना कोणत्या कंपनीचे असल्याचा दावा करतात आणि दररोज पैसे पुरवण्याची चर्चा करतात. घरबसल्या आरामात काम करता येतं असं म्हणतात. एकदा वापरकर्त्यांना त्यांचे पैसे मिळाले की ते स्कॅमरवर विश्वास ठेवू लागतात आणि मोठ्या घोटाळ्यात अडकतात. अशा घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अशा प्रकरणांपासून दूर राहण्याचीही गरज आहे.

# कच्ची केळी खाण्याचे फायदे



**वजन होते कमी :** वजन कमी करण्यासाठी रोज एक कच्चे केळे खायचा सल्ला डॉक्टर देतात. केळ्यामध्ये असलेल्या फायबर्समुळे शरीरातील अनावश्यक फॅट सेल्स काढून टाकायला मदत होते.

**बद्धकोष्ठतेच्या समस्येवर उपाय :** कच्च्या केळ्यामध्ये असलेल्या फायबर आणि स्टार्चमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

**भुकेवर ताबा मिळवण्यासाठी :** कच्च्या केळ्यांमधील फायबर, इतर पोषक गुणांमुळे भुकेवर ताबा मिळवता येतो. कच्ची केळी खाल्ल्यामुळे लागणारी भूक नियंत्रणात येते. जंकफूडपासून वाचता येऊ शकते.

**पचन प्रक्रिया होते चांगली :** कच्ची केळी खाल्ल्यामुळे पचन प्रक्रिया चांगली होण्यास मदत होते. कच्च्या केळ्यामुळे कॅन्सरचा धोकाही कमी होतो. यातील कॅल्शिअममुळे हाडे मजबूत होतात.

**डायबिटीसवर नियंत्रण –** तुमचा डायबिटीस प्राथमिक स्टेजमध्ये असेल तर कच्ची केळी खायला सुरुवात करा. कच्च्या केळ्यामुळे डायबिटीस नियंत्रणात यायला मदत होते.

# केसांचे आरोग्य

**हेल्थ कॉन्शस पण ज्ञान मात्र जाहिरातीतून मिळवलेले, अशा विचित्र परिस्थितीला आपण सध्या सामोरे जात आहोत. जगन्मान्य असलेली 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पनाही आता जवळजवळ अस्तित्व हरवून बसलेली. अशावेळी किरकोळ आजारासाठी अथवा काही आरोग्यदायी सल्ल्यांसाठी काही माहिती लागली तर ती कुठे मिळवायची? असा प्रश्न येतो.**

फार पूर्वीपासून भारतीय संस्कृतीत किरकोळ आजारांसाठी आजीबाईचा बटवा महत्त्वाचे स्थान मिळवून होता. आता आजीच घरात असणे अवघड, तर बटवा कुठून मिळायचा? पण आजही अगदी घरातच असणाऱ्या साध्यासाध्या पदार्थांपासून किरकोळ उपचार कसे करायचे याचे मार्गदर्शन देण्याचा हा प्रयत्न. यातील उपचार प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य श्रीकांत बागेवाडीकर यांना विचारून घेतले आहेत.



केस हा साऱ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय. केसांमुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला एक प्रकारची ओळख मिळत असते. विशेषतः महिलावर्गाला ही ओळख जास्त महत्त्वाची असते. केस कुणाच्याही सौंदर्यात कशी भर घालतात हे काही सांगायला नको. मात्र या केसांची निगा आणि काही तक्रारी असल्यास त्या दूर करणे हे मोठे कामच होऊन बसते. अशा वेळी हे छोटे छोटे उपाय नक्कीच फायद्याचे ठरतात. चटकन करता येणारे हे उपाय करून पाहावेत असेच आहेत.

**केस पांढरे होणे –** १०० ग्रॅम खोबरेल तेलात २० ते २५ लाल जास्वंदीची फुले मंद आचेवर तळून काढावीत. पाण्याचा अंश गेला की फुलांसकट तेल गार होऊ द्यावे व मग गाळून बाटलीत भरावे. हे तेल आठवड्यातून किमान दोन वेळा केसांना लावावे.जास्वंद हा उत्तम नैसर्गिक डाय असून त्याचे इंग्रजी नाव 'शू फ्लॉवर ' असे आहे. पूर्वीच्या काळी ही फुले बुटांना पॉलिश करण्यासाठी वापरली जात असत.

**दह्यामध्ये दुधापेक्षा अधिक प्रमाणात प्रथिने आणि जीवनसत्त्वे असतात, तसेच दुधाच्या मानाने दही पचण्यास जास्त हलके असते. दह्याच्या सेवनाने पचनशक्ती चांगली राहते. याशिवाय आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेली अनेक पोषक तत्त्वे दह्यामध्ये आहेत. दही हे प्रथिनांचे प्रमुख स्रोत असून, ही प्रथिने दुधात असलेल्या प्रथिनांच्या मानाने पचवण्यास हलकी असतात. ज्या व्यक्तींना दुधामध्ये असलेल्या लॅक्टोज या तत्त्वाची ॲलर्जी असते, त्या व्यक्तींना दही खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देतात. दुधाचे दह्यामध्ये परिवर्तन होत असताना, दुधातील लॅक्टोजचे लॅक्टिक ॲसिडमध्ये रूपांतर होत असते. त्यामुळे ज्यांना दूध पचत नाही, त्यांनी दह्याचे सेवन नियमित करावे.**

# दही; स्वादिष्ट आणि आरोग्यदायी



**दह्यामध्ये** असलेल्या कॅल्शियम आणि रिबोफ्लाविन या घटकांमुळे शरीरातील हाडांचा, ओस्टियोपोरोसीस सारख्या व्याधीपासून बचाव होतो. या व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तींनी दिवसातून किमान एकदा तरी दह्याचे सेवन अवश्य करावयास हवे, असे आहारतज्ज्ञांचे मत आहे. दह्यामध्ये अनेक रोगांवर मात करणारी गुणकारी तत्त्वे आहेत. पोटाशी निगडित विकार असणाऱ्यांनी दह्याचे सेवन करावे. जुलाब किंवा बद्धकोष्ठता यापैकी कशाचाही त्रास होत असल्यास दह्याच्या सेवनाने आराम पडतो. दह्यामध्ये असलेल्या लॅक्टोबॅसिली नामक बॅक्टेरियामुळे पोटाशी निगडित विकार बरे होण्यास मदत मिळते.

दह्याच्या सेवनाने कोलनचे आरोग्यही चांगले राहते. मोठ्या आतड्याच्या मुख्य आणि सर्वात लांब भागाला कोलन म्हणतात. दह्याच्या नियमित सेवनाने दह्यातील बॅक्टेरियामुळे कोलनचे आरोग्य सुधारून, कोलनचा कर्करोग होण्याची संभावना कमी होते. याशिवाय त्वचेशी निगडित समस्यांमध्ये ही दही किंवा ताकाचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. दह्याने किंवा ताकाने पोटामध्ये शीतलता जाणवते. त्यामुळे सतत खाज सुटणे, त्वचेवर लाल चट्टे उठणे, अंगाची आग होणे, या तक्रारी पुष्कळ प्रमाणात कमी होतात. तसेच निद्रानाश असलेल्या व्यक्तींनी रात्री झोपताना दह्याने डोक्याची मालिश करावी व आपल्या आहारात दह्याचा नियमित समावेश करावा. दह्यामध्ये गूळ मिसळून खाल्ल्यास कामोत्तेजना वाढते. वजन घटवण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी लो-फॅट दह्याचे सेवन करावे.

दह्यामध्ये झिंक, कॅल्शियम, जीवनसत्त्व बी१, बी२, बी६, आणि यीस्ट ही तत्त्वेही असतात. झिंक असल्याने दह्यामध्ये अँटी इंफ्लेमेटरी गुण आहेत. त्यामुळे त्वचेवरील मुरुमे कमी होण्यास मदत होते. तसेच दह्यामध्ये असलेली एन्झाइम्स त्वचेला आर्द्रता देतात, त्वचेवरील रंध्रांचा आकार कमी करतात, आणि त्वचा मुलायम, सतेज बनवतात. दही केसांच्या आरोग्यासाठी देखील अतिशय फायदेशीर आहे.

# आठ वर्षाखालील मुलांना देऊ नका चहा-कॉफी
### आरोग्यावर होतील 'हे' गंभीर परिणाम

**लहान मुलांसमोर मोठी माणसं जेव्हा चहा-कॉफी पितात, तेव्हा त्यांनाही चहा-कॉफी पिण्याची इच्छा होते. अशा वेळी तू लहान आहेस, असे सांगून मोठी माणसे लहान मुलांना चहा-कॉफी देण्यास टाळाटाळ करतात. मात्र काही जण मुलांच्या हट्टापुढे गुडघे देऊन त्याला चहा-कॉफी देतात आणि मग हळूहळू त्यांना त्याचे व्यसन लागते. पण तुम्हाला माहीत आहे की, आठ वर्षाखालील लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास त्यांच्या शरीरावर फार गंभीर परिणाम होऊ शकतात.**

तसे पाहता जंकफूड, शीतपेय आणि चहा-कॉफी या तिन्ही गोष्टी लहान मुलांच्या शरीरास खूपच घातक आहेत. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, कॉफीमध्ये भरपूर प्रमाणस कॅफीन असते. हा पदार्थ खूपच उत्तेजक असल्यामुळे तो लहान मुलांच्या शरीरास अपायकारक आहे. त्यामुळे त्यांना वेगवेगळे आजार होऊ शकतात.

**लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास होऊ शकतात हे परिणाम**

▮ लहान मुलांना पोटदुखीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.

▮ चहा-कॉफी प्यायल्याने त्यांना झोप लागत नाही.

▮ लहान मुलांच्या हृदयाचे ठोके वेगाने होतात.

▮ तसेच खूप कमी वयात त्यांना डोकेदुखीची समस्या उद्‌भवू शकते.

▮ शक्यतो लहान मुलांना आठ वर्षांनंतर आणि जमल्यास १६ वर्षांनंतर चहा-कॉफी देणे अधिक चांगले. जमेल तितके त्यांना चहा-कॉफीपासून दूर ठेवा आणि त्यापेक्षा फायद्याचे आणि पोषक असे दूध रोज प्यायला द्या.

जर तुम्ही तुमच्या मुलांना कोल्ड्रिंक्स, कॉफी, फ्लेव्हर्ड फ्रुट ड्रिंक्स यांपासून दूर ठेवला नाहीत तर त्यांच्या शरीरावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. यात काहींना खूप त्वरित तर काही काही काळानंतर अनेक गंभीर परिणामांना आणि आजारांना सामारे जावे लागू शकते.



# पाठदुखीपासून असा मिळवा आराम



आजकालच्या धावत्या युगाला अनुसरून बदललेली आपली जीवनशैली, असंतुलित आहार, जेवण्याचे अनियमित असणारे वेळापत्रक, व्यायामाचा अभाव आणि काम करताना किंवा एरवीही खुर्चीवर बसतानाची चुकीची पोझिशन किंवा स्थिती या सगळ्यांमुळे आपल्यापैकी बहुतेकांनी पाठदुखीची तक्रार कधी ना कधी अनुभवलेली असते. एकदा पाठदुखी सुरू झाली की मग रोजची लहानसहान कामे करणे देखील अशक्यप्राय होऊन बसते. काही प्राथमिक औषधोपचारांनी तात्पुरता आराम मिळत असला तरी या औषधांचा परिणाम ओसरला की पाठदुखी पुनश्च सुरू होते. तसेच फार काळ जर पेन किलर्सचा वापर केला गेला, तर त्याचेही दुष्परिणाम जाणवू लागतात. परिणामी, पाठदुखीच्या जोडीने ॲसिडिटी, शरीरामध्ये उष्णता वाढून सतत तोंड येणे, असल्या नव्या तक्रारी सुरू होतात. त्यामुळे पाठदुखीच्या त्रासातून मुक्तता मिळवण्याकरिता शक्यतो नैसर्गिक आणि सुरक्षित उपायांचा वापर करणे कधीही चांगले.

हर्बल किंवा आयुर्वेदिक तेलांनी केलेला मसाज पाठदुखीसाठी चांगला आहे. घरच्या घरी मसाज करण्यासाठी निलगिरी, मोहरी, किंवा नारळाच्या तेलाचा वापर केला जाऊ शकतो. तेल थोडे गरम करून घेऊन मग त्याने मसाज करावा. त्यानंतर थोड्या वेळाकरिता तेल तसेच राहू देऊन, मग गरम पाण्याने स्नान करावे. आजकाल बाजारामध्ये खास मसाजसाठी अनेक प्रकारची आयुर्वेदिक व हर्बल तेल उपलब्ध असतात. पण वैद्यकीय सल्ल्यानुसारच या तेलांचा वापर करावा. पाठदुखीसाठी तेलाचा मसाज आवश्यकता असेल तर दररोज करावा.

हळदीमध्ये असलेल्या 'कुकुर्मीन' या तत्त्वामुळे अंगावरील सूज कमी होऊन अंगदुखीपासून आराम मिळतो. त्यामुळे पाठदुखी सतावत असल्यास दररोज एक ग्लास दुधामध्ये पाव चमचा हळद घालून प्यावे. आवश्यकता वाटल्यास दुधामध्ये अर्धा चमचा मध चवीकरिता घालावा. त्याचप्रमाणे मॅग्नेशियम सल्फेटमुळे (यालाच इप्सम सॉल्ट असेही म्हणतात) ही अंगावरील सूज कमी होण्यास मदत मिळते. याच्या वापराने रक्ताभिसरण सुधारून, अंगदुखी कमी होते.

अंघोळीच्या गरम पाण्यामध्ये हे इप्सम सॉल्ट घालून ते पाणी पाठीवर घेत पाठ शेकून काढावी. आल्याचा वापर केल्यानेही अंगावरील सूज व दुखणे कमी होण्यास मदत होते. दीड कप पाण्यामध्ये आल्याचे काही तुकडे घालून हे पाणी उकळून घ्यावे. दिवसभरात हे पाणी थोडे-थोडे करून तीन ते चार वेळा प्यावे.

बर्फाची पिशवी पाठीवर फिरवल्यानेही पाठीवर सूज असल्यास ती कमी होऊन पाठदुखी कमी होते. जर बर्फाची पिशवी नसेल, तर एखाद्या जाडसर टॉवेलमध्ये बर्फ घेऊन तो बर्फ पाठ दुखत असलेल्या ठिकाणी पंधरा ते वीस मिनिटे फिरवावा. पाठदुखीमध्ये गरम पाण्याच्या पिशवीचा शेक घेतल्यानेही आराम मिळतो.

# ३० किमी पाठलाग करून ठोकल्या बेड्या, ३० लाखांचे सोने जप्त

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

नाशिकच्या अंबड पोलिसांनी संशयितांचा तब्बल ओझरपर्यंत ३० किलोमीटर पाठलाग करून, पोलीस असल्याची बतावणी करत नागरिकांना लुटणाऱ्या दोन सराईतांना सिनेस्टाईल अटक केली आहे. नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यातील कॉन्स्टेबल मयूर पवार यांनी गेल्या २ वर्षापासून शहरात घडत असलेल्या 'पोलीस बतावणी करून नागरिकांची लूट' या प्रकरणांचा आणि त्याबाबतच्या उउळश फुटेजचा सखोल अभ्यास केला होता.

**पाथर्डी फाटा ते ओझर थरारक पाठलाग**

शहराच्या वेगवेगळ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांची लूट केली जात होती. अनेकांचे सोने या चोरट्यांनी लुटल्याच्या घटना समोर आल्या होत्या. पाथर्डी फाटा परिसरात पोलीस कॉन्स्टेबल मयूर पवार पेट्रोलिंग करत असताना त्यांना दोन संशयितांवर संशय बळावला. त्यांनी वरिष्ठांच्या परवानगीनुसार त्यांचा पाठलाग सुरू केला. हा सर्व थरार सिनेमातील एखाद्या दृश्याप्रमाणे मुंबई-आग्रा हायवेवर सुरू होता. अखेर अंबड पोलिसांनी या दोघा सराईतांना ओझर येथे अडवले. या दरम्यान संशयित आणि पोलीस यांच्यात झटापटही झाली, मात्र पोलिसांनी शिताफीने दोघांना अटक केली.

**तोतया पोलिसांची टोळी गजाआड...**



### गुन्ह्यांची कबुली आणि मुद्देमाल जप्त

अमजद अली अकबर अली आणि फैयाज इम्तियाज अन्सारी (रा. भिवंडी) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर दोन्ही सराईतांनी लुटीची पद्धत आणि केलेल्या गुन्ह्यांची उकल केली. या दोघांनी नाशिक शहर परिसरात ४२, नाशिक ग्रामीणमध्ये १०, धुळ्यात १० आणि कर्नाटक राज्यात १ असे पोलीस बतावणी करून लूट केल्याच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्याकडून पोलिसांनी १० गुन्ह्यांमधील तब्बल २० तोळे (२०० ग्रॅम) सोने, असा एकूण ३० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### गुंगारा देण्याची पद्धत

पोलिसांकडून त्यांच्या आणखी ४ साथीदारांची माहिती समोर आली असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. अटक केलेल्या सराईतांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या आरोपींवर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्याची तयारी सुरू आहे. ताब्यात घेण्यात आलेले सराईत शहरात गुन्हे करून मालेगाव येथील गजबजलेल्या भागात वास्तव्यास राहत होते. शहरातून गुन्हे केल्यानंतर ते मालेगाव येथील भाडेतत्त्वावर घेतलेल्या घरात जात आणि तिथे वेशभूषा बदलून पुन्हा मुंबईकडे रवाना होत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### मोठ्या टोळीचा संशय

येत्या काळात या ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. यामागे एखादी मोठी टोळी सक्रिय असावी, असा संशय पोलिसांना असून त्या दिशेने आता नाशिक पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अवकाळी पावसाने शेती पिकांचे मोठे नुकसान
## आंब्याच्या बागांनाही अवकाळीचा फटका



■ बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाच्या सरी, गारा कोसळल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ऐन काढणीच्या टप्प्यावर आलेली गहू, हरभरा यासह अन्य रब्बी पिके भिजली. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण कायम असून त्याचा थेट परिणाम शेतशिवारातील बहरलेल्या रब्बी पिकांवर दिसून येत आहे. गहू, ज्वारी, कांदा आणि हरभरा या पिकांवर किडी, अळी व विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. परिणामी उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. काही ठिकाणी आंब्याच्या बागांनाही फटका बसला असून मोहोर गळून पडला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील पूस परिसरासह काही गावांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. बीड शहर व परिसरातही पावसाच्या सरी बरसल्या. या पावसामुळे काढणीला आलेला गहू व हरभरा भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान आहे. मागील पाच वर्षांपासून फेब्रुवारी अखेर व मार्चच्या पहिल्या आठवड्यात अवकाळी पाऊस व गारपिटीच्या घटना घडताना दिसत असून, याच काळात काढणीस आलेली पिके मोठ्या प्रमाणात बाधित होत आहेत. यंदा माजलगाव धरण भरलेले असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात रब्बी हंगामाची पेरणी केली होती.

हरभरा गहू समवेत ज्वारी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करत मदत जाहीर करावी अशी मागणी पुढे आली आहे मशागतीसाठी खर्च करून जोपासलेली पिके अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झाली असून शेतकरी हतबल झाला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करत आहेत.

## २९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई 'डेली' विमानसेवा
# सकाळी मुंबईला जाऊन संध्याकाळी येता येणार



■ कोल्हापूर। प्रतिनिधी,

कोल्हापूरच्या उद्योग, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला मोठी गती देणारी बातमी समोर आली आहे. २९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई मार्गावर 'इंडिगो' कंपनीची विमानसेवा आठवड्यातील सातही दिवस सुरू होत आहे. विशेष म्हणजे ही सेवा सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन सत्रांत उपलब्ध होणार असल्याने प्रवाशांचा मोठा वेळ वाचणार आहे. कोल्हापूरकरांना आता मुंबईतील आपली कामे आटोपून त्याच दिवशी परतणे शक्य होणार आहे. या नवीन विमानसेवेमुळे कोल्हापूर आणि मुंबईतील अंतर केवळ तासाभराचे उरले असून, पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. खासदार धनंजय महाडिक यांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

"कोल्हापूरकरांची ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. सोयीस्कर वेळेतील या विमानसेवेमुळे मुंबई-कोल्हापूर प्रवास अधिक सुखकर होईल आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात भर पडेल."
- धनंजय महाडिक, खासदार

**ठळक वैशिष्ट्ये**

- दोन सत्रांत सेवा : सकाळी मुंबईला जाऊन कामे पूर्ण करून रात्री कोल्हापुरात परतण्याची सुवर्णसंधी.
- नवी मुंबई कनेक्टिव्हिटी : ही सेवा थेट नवी मुंबई विमानतळावरून कार्यान्वित होणार आहे.
- तिकीट दर : या प्रवासाचे सुरुवातीचे तिकीट दर ७,६०० रुपये इतके असणार आहेत.
- विकासाला चालना : कोल्हापूर विमानतळावर नवीन टर्मिनसचे काम सुरू असतानाच ही सेवा सुरू झाल्याने पर्यटनाला आणि स्थानिक उद्योजकांना मोठा फायदा होणार आहे.

**अशा असतील फेऱ्या**

- सकाळची फेरी : नवी मुंबई सकाळी ८:०० ते कोल्हापूर सकाळी ९:१५ वाजता.
- कोल्हापूर सकाळी ९:३५ ते नवी मुंबई सकाळी १०:३५
- संध्याकाळची फेरी : नवी मुंबई संध्याकाळी ७:२० ते कोल्हापूर रात्री ८:३० वाजता.
- कोल्हापूर रात्री ८:५० ते नवी मुंबई ते रात्री ९:५० वाजता

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अभूतपूर्व वाहतूककोंडी
## वाहनचालकांना मिळणार ५.१६ कोटींचा टोल परतावा

■ मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकर उलटल्याने निर्माण झालेल्या प्रचंड वाहतूककोंडीत अडकलेल्या एक लाखांहून अधिक वाहनधारकांना एकूण ५.१६ कोटी रुपयांचा टोल परतावा देण्यात येणार असल्याची माहिती 'एमएसआरडीसी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.



३ फेब्रुवारी रोजी खोपोली परिसरात द्रुतगती मार्गावर गॅस टँकर उलटल्याने ३३ तास वाहतूक ठप्प झाली होती. अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहनधारक आणि प्रवाशांना पाणी, अन्न आणि इतर मूलभूत सुविधांच्या टंचाईचा सामना करावा लागला. अपघातानंतर प्रशासनाने तत्काळ टोल वसुली स्थगित करण्याचे आदेश दिले होते. मात्र, तोपर्यंत अनेक वाहनधारकांच्या 'फास्टॅग' खात्यांमधून टोलची रक्कम वजा करण्यात आली होती.

'टोल वसुली थांबवण्याचे आदेश दिल्यानंतर वाहनधारकांकडून वसूल झालेली संपूर्ण रक्कम परत करण्याचा निर्णय आता घेण्यात आला आहे. ५.१६ कोटी रुपयांचा परतावा 'एमएसआरडीसी'कडून परत देण्याची प्रक्रिया राबवली जाईल. ही रक्कम पुढील काही दिवसांत संबंधित वाहनधारकांच्या 'फास्टॅग' खात्यात थेट जमा केली जाईल,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या परताव्यामध्ये दोन्ही मार्गांवरील वसूल केलेल्या टोलचा समावेश असून, टोल ऑपरेटरला 'फास्टॅग' व्यवहारांची सविस्तर माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

# बांधकाम प्रकल्पांमुळे ठाण्याची हवा प्रदूषित... २८ ठिकाणी नियमभंग, ५.२५ लाखांचा दंड

■ ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे हवा प्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक बांधकामस्थळांवर आवश्यक उपाययोजना न केल्याने शहरातील हवा प्रदूषित होत असून नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



सध्या ठाणे शहराची हवा 'मध्यम प्रदूषित' गटात मोडत असून, महापालिकेकडून विविध उपाययोजना करूनही प्रदूषणात अपेक्षित घट होताना दिसत नाही. विशेषतः सकाळच्या वेळेत हवेची गुणवत्ता आणखी खालावत असल्याचे निरीक्षण आहे. हवेतील प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेच्या माध्यमातून शहरात विविध ठिकाणी मिस्ट स्प्रे यंत्रणा बसविण्यात आली असून अन्य उपाययोजनाही राबविण्यात येत आहेत. मात्र, त्याचा प्रभाव मर्यादित असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकाच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने १ ते २२ जानेवारी या कालावधीत शहरातील सुरू असलेल्या ३३ बांधकामस्थळांची तपासणी केली. यामध्ये २८ ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले संबंधित बांधकाम असून व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. काहींवर थेट दंडात्मक कारवाई - करण्यात आली असून आतापर्यंत - एकूण ५ लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

दरम्यान, बांधकामस्थळांवर काही हवेतील प्रदूषणाचे प्रमाण मोजण्यासाठी यंत्रणा तसेच मिस्ट स्प्रे बसविण्यात - आले असले तरी शहरातील हवा - अद्याप मध्यम प्रदूषित गटातच - मोडत आहे. शहरात वाढत असलेली - वाहनसंख्या हे देखील प्रदूषणाचे एक प्रमुख कारण ठरत आहे. सकाळ, दुपार आणि सायंकाळी शहरातील विविध रस्त्यांवर वाहतूककोंडी होत असून त्याचा परिणाम हवेच्या गुणवत्तेवर होत आहे. मागील दोन आठवड्यांपासून शहरातील विविध खासगी दवाखान्यांमध्ये दररोज ५० ते ६० रुग्ण सर्दी, खोकला आणि तापाच्या तक्रारींसह उपचारासाठी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

**पायाभूत प्रकल्पांची प्रदूषणात भर**

शहरात मेट्रोसह कोस्टल रोड, फ्री वे आणि बोरिवली टनेल यांसारख्या पायाभूत प्रकल्पांची कामे सुरू असल्यानेही प्रदूषणात भर पडत आहे. फेब्रुवारी महिन्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (अदक) सरासरी ११५ इतका नोंदविण्यात आला आहे. शाहू मार्केट, नौपाडा येथे अदक११२, वर्तक नगर परिसरात १२८, कोपरी प्रभाग कार्यालय परिसरात १२३, कासारवडवली येथे १०२ तर उपवन परिसरात १०९ इतका अदकनोंदविण्यात आला आहे. सध्या ठाणे शहर 'पिवळ्या' गटात मोडत असून या गटातील अदक १०१ ते २०० दरम्यान असतो.

**तक्रारीसाठी हेल्पलाइन**

हवा प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून प्रदूषणासंदभार्तील तक्रारी नोंदविण्यासाठी हेल्पलाइन व व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांनी छायाचित्रांसह तक्रार नोंदवावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेग मंदावला
## कोंडी फोडण्यासाठी बोरघाटात तातडीची वाहतूक बदल व्यवस्था

■ मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आज (दि.२४) दुपारी वाहतूक कोंडीमुळे अनेक प्रवासी सुमारे तीन- चार किलोमीटर लांब रांगेत अडकले होते, त्यामुळे महामार्ग प्रशासनाने तातडीची वाहतूक बदल व्यवस्था लागू केली आहे.



१५ मिनिटांचा वाहतूक ब्लॉक, अमृतांजन पूल ते दत्तवाडी दरम्यान सर्वाधिक कोंडी

सकाळपासूनच जड वाहतूक सुरू होती. अमृतांजन पुलापासून दत्तवाडीपर्यंत वाहनांची गती अत्यंत मंदावली. घाटातील तीव्र वळणे आणि काही वाहनांचे बिघाड यामुळे महत्त्वाचे ह्यपासिंग पॉइंटह्ल बंद पडले आणि कोंडी वाढत गेली.

कार्यालयीन कर्मचारी आणि लांब पल्ल्याचे प्रवासी अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगेत अडकून पडले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता निर्माण होताच महामार्ग पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली.

कोंडी फोडण्यासाठी मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर १५ मिनिटांचा रणनीतिक वाहतूक ब्लॉक लागू करण्यात आला आहे. मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्पुरती थांबवून त्या रस्त्यावरील अतिरिक्त क्षमतेचा वापर पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांची रांग कमी करण्यासाठी केला जात आहे. कोंडीचा सर्वाधिक परिणाम पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर झाला आहे.

**प्रवाशांना आवाहन**

महामार्ग पोलीस युद्धपातळीवर वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न करत आहेत. प्रवाशांनी संयम बाळगावा, शक्य असल्यास प्रवास पुढे ढकलावा किंवा लोणावळा व खालापूर येथे काही वेळ थांबून पुढे जावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहतूक पूर्णपणे सुरळीत झाल्याची अधिकृत माहिती मिळेपर्यंत पर्यायी नियोजन करण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

# डोंबिवलीत ९ तास पाणीपुरवठा बंद
## पाणी जपून वापरण्याचे महापालिकेचे आवाहन



■ बीड। प्रतिनिधी,

डोंबिवली शहरात मंगळवारी (दि.२४ फेब्रुवारी) तब्बल ९ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शहराच्या पाणीपुरवठा यंत्रणेशी संबंधित दोन महत्त्वाच्या ठिकाणी तातडीची देखभाल व दुरुस्ती कामे हाती घेण्यात येणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत डोंबिवली पूर्व आणि डोंबिवली पश्चिम या दोन्ही भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील.

### दुरुस्ती नेमकी कुठे?

मोहिली पंपिंग स्टेशन आणि नेतीवली जलशुद्धीकरण प्रकल्प येथे विद्युत आणि यांत्रिक दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. उल्हास नदीतून काढलेले पाणी प्रथम मोहिली पंपिंग स्टेशनवर आणले जाते. त्यानंतर नेतीवली प्रकल्पात त्यावर प्रक्रिया करून ते शहरात वितरित केले जाते. या दोन्ही ठिकाणी बिघाड झाल्यास शहरातील मोठ्या भागावर थेट परिणाम होऊ शकतो.

### पाणी जपून वापरण्याचे नागरिकांना आवाहन

नागरिकांना पुरेसे पाणी साठवून ठेवण्याचे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. पाण्याशी संबंधित कामांचे नियोजन त्यानुसार करावे, असेही सांगण्यात आले आहे.

मंगळवारी सायंकाळी दुरुस्तीचे काम पूर्ण होताच पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, असे प्रशासनाने आश्वासन दिले आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**केडीएमसीचे स्पष्टीकरण**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून स्पष्ट करण्यात आले की, वेळेत दुरुस्ती न केल्यास अचानक यंत्रणा बंद पडण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नियोजित बंद ठेवून आवश्यक कामे पूर्ण करणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात अधिक काळासाठी अनपेक्षित पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे. डोंबिवली पूर्व आणि पश्चिम या दोन्ही विभागांचा पाणीपुरवठा एकाच पंपिंग व शुद्धीकरण यंत्रणेवर अवलंबून असल्याने हा परिणाम शहरभर जाणवणार आहे.

# संगमनेरमध्ये शिवजयंतीच्या वादातून तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

■ संगमनेर। प्रतिनिधी,

संगमनेर शहरात जुन्या वादातून एका तरुणावर पाच जणांच्या टोळक्याने कोयता आणि बेल्टने भीषण हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फियार्दी ममता रोहित वाळके (वय २९, रा. श्रीरामनगर) यांचे पती रोहित वाळके हे २२ फेब्रुवारी रोजी रात्री १०:३० च्या सुमारास इंदिरानगर येथील म्हसोबा मंदिर जवळील मैदानावर 'टुर्ला' मॅच खेळण्यासाठी गेले होते. यावेळी हल्लेखोरांनी जुन्या वादाचा राग मनात धरून रोहित यांच्यावर हल्ला केला. काही दिवसांपूर्वी शिवजयंतीच्या मिरवणुकीत नाचत असताना, रोहित यांचा मित्र उत्तम काकड याला आरोपींनी ओढल्यामुळे रोहित यांनी त्यांना तसे करण्यापासून रोखले होते. याच कारणावरून या पाच जणांनी त्यांच्याशी वाद उकरून काढला.त्यांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने रोहित यांच्यावर हल्ला चढवला. अथर्व रासने, ओम काथे, साहिल देवरे, सुमित शेवंते व शनैश रोकडे (सर्व रा. संगमनेर) यांनी रोहित यांच्या मानेवर कोयत्याने वार केला, खांद्यावर कोयता मारून गंभीर दुखापत केली, तसेच बेल्टने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या घटनेनंतर जखमी रोहित यांना तातडीने संगमनेर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी ममता रोहित वाळके यांनी दिलेल्या फियार्दीवरून शहर पोलिसांनी वरील पाच जणांविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १६६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इठर) कलम १०९, ११८(१), ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये अथर्व रासने याला पोलिसांनी अटक केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक समीर बारवकर आणि पोलीस उपनिरीक्षक पगारे यांनी घटनास्थळी भेट दिली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इम्रान खान करत आहेत. शहरात अशा प्रकारे शस्त्राने हल्ला झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



# आता शिळफाटा रस्त्यावर मेट्रोने प्रवास... मेट्रो १२ च्या विस्तारीकरणाची घोषणा... एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पात समावेश

**मेट्रो १२ अ ची स्थानके**

या मार्गावर एकूण १२ उन्नत (एलिव्हेटेड) स्थानके प्रस्तावित आहेत. प्रमुख स्थानके पुढीलप्रमाणे मानपाडा, कटाई नाका, कल्याण ग्रोथ सेंटर, देसाई नाका, पडलेगाव, कल्याण फाटा, गोठेघर, दहिसार मोरी, दहिसारगाव, किरावली गाव, रोहिंजण आणि खुतारी गाव.



■ जालना। प्रतिनिधी,

कल्याण लोकसभा मतदारसंघाला मुंबई आणि नवी मुंबईशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत कल्याण-तळोजा मेट्रो मार्ग क्रमांक १२ च्या विस्तारीकरणाची घोषणा करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी एमएमआरडीएच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात या ऐतिहासिक प्रकल्पाचा समावेश केला आहे.

कल्याण-डोंबिवली शहराला तळोजा मार्गे थेट नवी मुंबईशी जोडणाऱ्या मेट्रो १२ या मागार्चे ह्यमेट्रो १२ अह्ल अंतर्गत विस्तारीकरण करण्यात येणार असून कल्याण-शिळफाटा रस्त्याला समांतर मेट्रो मार्गिका उभारली जाणार आहे. कल्याण फाट्यावरून ही मेट्रो दहिसार मोरी मार्गे तळोजा मेट्रो स्थानकापर्यंत धावणार असून यामुळे शिळफाटा रस्त्यावरील वाहनांचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ८ हजार ४१४.५३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील वाहतूक व्यवस्थेत गेल्या काही वर्षांत लक्षणीय सुधारणा झाली असून मेट्रो, रेल्वे, रस्ते, उड्डाणपूल, उन्नत मार्ग, रेल्वे पूल तसेच रस्ते रुंदीकरणाचे अनेक प्रकल्प पूर्णत्वास गेले आहेत. खासदार डॉ. शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रकल्पांना गती मिळाली असून एमएमआरडीएच्या अर्थसंकल्पात मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी ४ हजार ८९७.१९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**कशी असेल मेट्रो १२ अ मार्गिका?**

ही विस्तारित मेट्रो मार्गिका कल्याण-मानपाडा-कटाई नाका-कल्याण फाटा मार्गे विद्यमान मेट्रो १२ शी खुतारी गावाजवळ एकत्रित होऊन तळोजा रेल्वे स्थानक (अमनदूत) पर्यंत पोहोचेल. कटाई नाका ते कल्याण फाटा दरम्यान प्रस्तावित कांजुरमार्ग ते बदलापूर मेट्रो १४ मागासीबत कॉमन ट्रॅक आणि स्टेशन शेअरिंग प्रस्तावित आहे. निलजे डेपो कनेक्शन, प्रस्तावित मेट्रो १४ इंटिग्रेशन तसेच ठाणे-बुलेट ट्रेन स्थानकाशी जोडणीही या मार्गाद्वारे करण्यात येणार आहे. सुधारित मार्गिकेची एकूण लांबी १८.४ किलोमीटर असून त्यापैकी सुमारे १०.५ किलोमीटरवर बांधकाम प्रगतिपथावर आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com